सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, १४ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १४४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माझी लाडकी बहीण योजना स्थगित करू- सुप्रीम कोर्ट

## भूखंड भरपाईच्या दिरंगाईवरून संतापले सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, १३ ऑगस्ट : राज्य सरकारच्या माझी लाडकी बहीण योजनेला स्थगिती देण्याचा इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिलाय. पुण्यातील एका भूखंड मालकाला सरकारने भरपाई न दिल्यामुळे संतप्त झाल्यामुळे न्या. भूषण गवई आणि केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला हा इशारा दिला आहे.

यासंदर्भात सर्वोच्च न्यायालय म्हणाले की, ज्या व्यक्तीने आपली जमीन गमावली आहे, त्याला राज्य सरकारनं योग्य मोबदला दिला नाही, तर तुमची लाडकी बहीण, लाडकी सून ज्या काही योजना आहेत त्या रोखू. तसेच, संबंधित जमिनीवर बांधलेली बांधकामे जमीनदोस्त करण्याचेही आदेश देऊ. इतकंच नव्हे, १९६३ पासून बेकायदेशीरपणे जमिनीचा वापर केल्याबद्दल तुम्हाला नुकसान भरपाई द्यावी लागेल आणि ती जमीन हवी असेल तर नव्या कायद्याने खरेदी करावी लागेल अशा शब्दात सरकारला कानपिचक्या दिल्यात.

टी एन गोदाबर्मन यांनी १९५० च्या दशकात पुण्यात २४ एकर जमीन विकत घेतली होती. राज्य सरकारने १९६३ मध्ये ती जमीन ताब्यात घेतली. त्या विरोधात जमीन मालकाच्या वारसदाराने खटला दाखल केला आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन शेवटी खटला जिंकला. त्यानंतर भरपाई अपेक्षित होती. मात्र, ही जमीन संरक्षण संस्थेला देण्यात आली आहे अशी भूमिका राज्य सरकारने घेतली. तर, संबंधित संरक्षण संस्थेनंही हात वर केले.

आमचा या वादाशी काही संबंध नाही. त्यामुळे आम्ही जागा सोडू शकत नाही, अशी भूमिका संरक्षण संस्थेने घेतली.शेवटी जमीन मालकानं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत आपल्याला पर्यायी जमीन मिळावी, अशी विनंती केली. मात्र, तब्बल १० वर्षे पर्यायी जमीन संबंधित याचिकाकर्त्याला दिली गेली नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. अखेर २००४ मध्ये पर्यायी जमीन देण्यात आली. प्रत्यक्षात ती जमीन वनक्षेत्रावरील होती. त्यामुळे पुन्हा पेच उभा राहिला. यावरून न्यायालयाने यापूर्वी राज्य सरकारवर ताशेरे ओढले होते.

राज्य सरकारने आर्थिक स्वरूपात भरपाई देण्याची तयारी दाखवली होती. मात्र त्यातही रेडी रेकनर आणि बाजारभाव असा घोळ घातला जात होता. त्यावरून न्यायालयाने सरकारला झापले. संबंधित व्यक्तीला द्यावयाच्या मोबदल्याचा योग्य आकडा आम्हाला सांगा. राज्याच्या मुख्य सचिवांना या संदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करायला सांगा. नाहीतर सगळ्या योजना स्थगित करू, असे न्यायमूर्ती गवई यांनी सरकारी वकिलांना सुनावले. तुम्ही न्यायालयाच्या प्रत्येक आदेशाकडे 'चलता है' पद्धतीनं बघू शकत नाही. लाडकी बहीण योजनेसाठी तुमच्याकडं पुरेसे पैसे आहेत. मी आजचं वर्तमानपत्र वाचलेय. मोफत योजनांसाठी सर्व पैसे खर्च केले जात आहेत. थोडे जमिनीच्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी द्या, असे न्यायमूर्ती गवई यांनी मागील सुनावणीच्या वेळी खडसावले होते.

## ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर!



मुंबई : सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर आज करण्यात आले. सन २०२४ च्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर झाला आहे. यासोबतच, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कारांची व बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने या पुरस्कारांची शिफारस केली आहे. विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार असून सर्व पुरस्कारार्थींचे सास्कृति कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले आहे.

संगीत व गायन क्षेत्रातील सातत्यपूर्ण आणि अमूल्य योगदानाबद्दल ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना २०२४ चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झालेला आहे. शास्त्रीय संगीतासाठी ज्यांनी आपले जीवन समर्पण केले आणि शास्त्रीय संगीत क्षेत्राची सेवा केली, त्या कलाकारांच्या योगदानाबद्दल दिला जाणारा सन २०२४ च्या भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार आरती अंकलीकर-टिकेकर यांना जाहीर झाला आहे.

नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार-२०२४ साठी मराठी रंगभूमीवर कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या प्रकाश बुध्दीसागर यांना जाहीर झाला आहे.

संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव २०२४ चा पुरस्कार शुभदा दादरकर यांना जाहीर झाला आहे. संगीत रंगभूमीसाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे.

संत साहित्यावर लेखन किंवा संतांना अभिप्रेत मानवतावादी कार्याबद्दल सन २०२४ चा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार संजयजी महाराज पाचपोर यांना जाहीर झाला आहे. तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कार २०२३ साठी शशिकला झुंबर सुक्रे यांच्या नावाची घोषणा झाली असून, २०२४ साठीचा पुरस्कार जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे. तमाशा क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ मान्यवर कलाकारास या पुरस्काराने गौरविण्यात येते.

सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत देण्यात येणाऱ्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ चीही घोषणा यावेळी केली.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते फुले पल्लवी तूर, वालाच्या फुले श्रवणी वाणाचे लोकार्पण

अहमदनगर, १३ ऑगस्ट :- महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत कार्यरत असलेल्या कडधान्य सुधार प्रकल्पाने विकसीत केलेला तुरीचा वाण फुले पल्लवी (फुले तुर १२-१९-२) आणि क्षमता असणार्या पिकावरील संशोधन प्रकल्पाने विकसीत केलेला चारधारी वालाचा वाण फुले श्रावणी (पी.डब्ल्यु.बी. १७-१८) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते राष्ट्राला अर्पण करण्यात आला. नवी दिल्ली येथील भारतीय कृषि संशोधन संस्थेच्या (पुसा) प्रक्षेत्रावर पंतप्रधानाच्या हस्ते हा लोकार्पण कार्यक्रम संपन्न झाला.हवामानाला अनुकुल,योग्य उत्पादन देणारे, किड व रोगांना कमी बळी पडणारे आणि जैवसंवर्धनयुक्त वाण विकसीत करण्यावर संशोधनाचा भर असावा असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले. या दोन वाणांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते राष्ट्राला लोकार्पण ही महात्मा फुले कृषि विद्यापीठासाठी अभिमानास्पद बाब आहे.यामुळे विद्यापीठाचे संशोधन अधिक लोकाभिमुख होण्यासाठी आणि वाण प्रसारास चालना मिळणार आहे,अशी माहिती महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु. डॉ. पी.जी. पाटील यांनी दिली.

# सरकारचे कान, डोळे उघडे असतील तर २० तारखेला सामोरे येईल : वसंत मुंडे

## छत्रपती संभाजीनगरातून पत्रकार संवाद यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचा वृत्तपत्र दिंडीने प्रारंभ





छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) - वृत्तपत्र विक्रेते आणि वर्तमान पत्रात काम करणाऱ्या लोकांकडेसुद्धा मते आहेत हे तुम्ही बघणार आहात का नाही, हा सवाल विचारण्यासाठी ही यात्रा आहे, क्रांती चौकातून या यात्रेचा दुसरा टप्पा सुरू होत असताना मी आव्हान करतो की, सरकारचे कान, डोळे उघडे असतील तर येत्या २० तारखेला पत्रकार संवाद यात्रेला सरकार सामोरे येईल आणि पत्रकार, वर्तमान पत्र विक्रेत्यांच्या ज्या मागण्या आहेत, त्या मंजूर करण्याची भूमिका घेईल, असे थेट आव्हान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दिक्षाभूमी ते मंत्रालय या पत्रकार संवाद यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यास छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकातून मंगळवार, दिनांक १३ ऑगस्ट रोजी प्रारंभ झाला. क्रांती चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून निघालेल्या पत्रकार संवाद यात्रेतील वृत्तपत्र दिंडीच्या उद्घाटन प्रसंगी वसंत मुंडे बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री खा. डॉ. भागवत कराड, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यसचिव डॉ. विश्वासराव आरोटे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी आदींची उपस्थिती होती. यावेळी पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांनी प्रास्ताविक केले.

पुढे बोलताना वसंत मुंडे म्हणाले की, सर्वसामान्य माणसांचा आवाज अधिक बुलंद करण्यासाठी व लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी सर्व प्रसार माध्यमे व त्यामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांचे संरक्षण व त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

पत्रकार संवाद यात्रेमागील भूमिका विषद करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे पुढे म्हणाले की, या देशातील लोकशाहीला अधिक बळकट करण्यासाठी तसेच पत्रकारांच्या हक्कासाठी तसेच पत्रकारांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी, वैचारिक घुसळण होण्यासाठी व सर्वसामान्य माणसांचा आवाज अधिक बुलंद करण्यासाठी या देशातील चौथास्तंभ व त्यात काम करणारे सर्व पत्रकार यांचे हक्क अबाधित राहिले पाहिजेत. यासाठी पत्रकारांच्या प्रश्नावर केवळ चर्चा करून भागणार नाही तर त्यांचे प्रश्न सरकार दरबारी पोहोचवण्याचा प्रयत्न या पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून आपण करणार आहोत.

यावेळी मनपा उपायुक्त रवींद्र जोगदंड, कुलस्वामीनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास कोरडे, शिवसेना ठाकरे गटाचे नारायण जाधव, मेडिकल असोसिएशनचे रोशन शिंदे, कमलेश मंडोरे आदींनी वसंत मुंडे यांचा सत्कार करत पत्रकार संघाच्या मागण्यांना पाठिंबा दिला.

यावेळी पत्रकार संघाचे महानगर अध्यक्ष अनिल सावंत, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम नगर, विलास शिंगी, छबूराव ताके, मुकेश मुंदडा, मनोज पाटणी, सुधीर कोर्टीकर, संजय व्यापारी, संदीप घंटे, सतीश पाटील, सुधाकर जेठे, समाधान वाणी, सचिन उबाळे, अतुल खंडगावकर, अभय विखणकर, शिवाजी आस्वार, रमेश कोंदलकर, गणेश भोसले, वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अण्णासाहेब जगताप, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष निलेश फाटके, मानकापे मामा, गणेश भोसले, माणिक कदम, भीमराव व्हायभट, आनंद अंभोरे, अमोल धामणे, राम काळे, राधाकृष्ण कुलकर्णी, घुगे, श्रमिक वर्तमानपत्र विक्रेते संघटना महाराष्ट्र राज्य छत्रपती संभाजीनगरचे प्रा. शिवाजीराव ढेपले, प्रकाश वाघ, विष्णू कावळे, विष्णू ढाकणे, पुंडलिक भोसले, रामकृष्ण राऊत राजीव, गायकवाड, विठ्ठल पारटकर, मनोज बोराडे अंबादास कोल्हे, संजय काथार तसेच राहुल मकासारे, शेख शेफिक, सुजित ताजने, श्री संत सावता महाराज भजनी मंडळाचे ह.भ. प. माधव महाराज इतरवाड आदींसह शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

### पत्रकारांसाठी प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून २० लाखपर्यंत कर्ज मिळण्यासाठी प्रयत्न करणार : डॉ. भागवत कराड

वृत्तपत्र दिंडी सकाळी साडेअकरा वाजता क्रांती चौक येथून निघाली असता खासदार भागवत कराड यांनी भाग घेऊन त्यांनी पत्रकार, विक्रेते यांच्या घरांसाठी मागण्या तत्काळ मांडणार असून कोविडसारख्या महाभयंकर रोगात मृत्यू पावलेल्या पत्रकारांच्या वारसांना आर्थिक मदत व सहकार्य करण्यासाठी मी स्वतः राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे. पत्रकारांसाठी प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून २० लाखपर्यंत कर्ज मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची त्यांनी सांगितले.

**ढोल ताशांच्या गजरात व टाळ मृदंगाच्या निनादात निघालेल्या वृत्तपत्र दिंडीने वेधले लक्ष क्रांती चौकातील उड्डाणपुलाखाली विविध वर्तमानपत्रांची पालखी ठेवण्यात आली होती. या पालखीचे पूजन करून या वृत्तपत्र दिंडीचा प्रारंभ झाला. ढोल ताशांच्या गजरात व टाळ मृदंगाच्या निनादात निघालेल्या वृत्तपत्र दिंडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.**

## वक्फ जेपीसीच्या अध्यक्षपदी जगदंबिका पाल यांची नियुक्ती

नवी दिल्ली, १३ ऑगस्ट : वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाबाबत स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) अध्यक्षपदी खासदार जगदंबिका पाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूण ३१ सदस्यीय जेपीसीत लोकसभेच्या २१ आणि राज्यसभेतील १० खासदारांचा समावेश आहे. केंद्र सरकारने हे वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत ८ ऑगस्ट रोजी सादर केले होते. त्यावेळी अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक सभागृहात मांडताच विरोधी पक्षाच्या नेत्यांनी गदारोळ सुरू केला होता. काँग्रेससह इंडिया आघाडीत असलेल्या पक्षांनी या विधेयकाला मुस्लिमविरोधी ठरवून गोंधळ घालण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याप्रकरणी संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) स्थापन करण्याची घोषणा केली.

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिंदे सरकारचा दूध उत्पादकांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय



मुंबई : राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत शिंदे-फडणवीस-पवार यांच्या महायुती सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित होते. राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत एकूण ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील दूध उत्पादकांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार विदर्भ आणि मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देण्यासाठी राज्य सरकारने १४९ कोटी रुपयांच्या निधी मंजूर केला आहे.







## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा; सहभागी होण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (जिमाका)- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत यावर्षी होणाऱ्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा आयोजित करण्यात येत असून उत्कृष्ट मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येतो. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने, स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या इमेलवर दि. ३१ ऑगस्ट पूर्वी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे,असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत सन २०२४ च्या गणेशोत्सवात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये स्पर्धा घेऊन विजेत्या मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहे. दि.७ सप्टेंबर पासून सार्वजनिक गणेशोत्सव सुरु होणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२४ अंतर्गत मुंबई, मुंबई (उपनगर), पुणे, ठाणे या जिल्ह्यातून प्रत्येक तीन व अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी एक या प्रमाणे ४४ गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यात येणार आहे. प्रथम पुरस्कार ५ लक्ष रुपये, द्वितीय अडीच लक्ष रुपये, तृतीय १ लक्ष रुपये पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. उर्वरित ४१ जिल्हास्तरीय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

धर्मादाय आयुक्त यांच्या कडे नोंदणी असलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे, स्थानिक स्वराज्य संस्थांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना यात सहभाग घेता येईल. www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.३१ जुलै २०२४ च्या शासननिर्णयात स्पर्धा निवडीचे निकष, अर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. इच्छुक मंडळांनी दि. ३१ ऑगस्ट पर्यंत आपले अर्ज mahotsav.plda@gmail.com या ई-मेलवर सादर करावे,असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

या स्पर्धेचे आयोजन करुन अभिप्रायासह गुणांकन करुन प्रस्तावास शासनास सादर करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती गणेश मंडळाच्या उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देईल. जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन देण्यात येणार आहे. तसेच गणेशोत्सव मंडळाची शिफारस करून त्यांची नावे, सर्व कागदपत्र व व्हीडीओसह राज्य समितीकडे सादर करण्यात येतील. निकालासंदर्भात स्वतंत्र सूचना देण्यात येतील,असेही कळविण्यात आले आहे.



## देश का गर्व-प्रदेश की कला उपक्रमामध्ये अद्भुत अजिंठा आणि वेरूळचा सन्मान

छत्रपती संभाजीनगर : 'देश की चाय' म्हणून नावाजल्या जाणारा, टाटा कन्ज्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडचा प्रमुख चहा ब्रँड टाटा टी प्रीमियमने यंदाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देश का गर्व-प्रदेश की कला 'देश का गर्व - प्रदेश की कला' हा आपला उपक्रम पुन्हा सुरु केला आहे. भारताची स्वातंत्र्योत्तर काळातील अभिमानास्पद कामगिरी दर्शवणाऱ्या गोष्टींचा गौरव यामध्ये केला जात आहे. युनेस्को जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवण्यात आलेली, अजिंठा आणि वेरूळ ही महाराष्ट्रातील ठिकाणे याचेच ठळक उदाहरण आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचालीतील हे महत्त्वाचे टप्पे भारताचा अभिमान आहेत त्यांचे महत्त्व लोकांच्या मनावर कायमचे ठसवले जावे यासाठी टाटा टी प्रीमियमने देशकागर्व हे लिमिटेड एडिशन कलेक्शन सादर केले आहे, जे क्षेत्रीय कलांपासून प्रेरणा घेऊन तयार केले आहे.

## नागीण रोगाबद्दल जागृतीसाठी एकत्र

छत्रपती संभाजीनगर : - नागीण रोगाबद्दल जागृती करण्यासाठी जीएसके ने एक ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन आणि मनोज पाहवा यांच्याबरोबर एक नवीन कॅम्पेन सुरू केलं आहे. कांजिण्या आणि नागीण यांच्यातील वैज्ञानिक संबंध या कॅम्पेन मधून सांगितला जाणार आहे. डायबेटिस असणाऱ्या लोकांना या रोगाचा धोका किती आहे याबद्दलही जागृती केली जाणार आहे.या कॅम्पेनवर प्रतिक्रिया देताना मनोज पाहवा म्हणाले, 'मी अशा वयोगटात आहे ज्यात नागीण होण्याची शक्यता आहे. जीएसकेच्या या उपक्रमातून मला या वेदनादायी रोगाबद्दल मला अधिक माहिती कळली आणि धोकादायक गोष्टी कोणत्या आहेत हेही कळलं. मला आरोग्याच्या अनेक समस्या आल्या आहेत. संसर्गजन्य आजार झाले की जगणं किती कठीण असतं याची मला कल्पना आहे.

## लष्कर ते ॲमेझॉन इंडियापर्यंत प्रवास

पुणे - देशातील सर्व नागरिक यंदा स्वातंत्र्य दिनी स्वातंत्र्याच्या उत्साहाला साजरे करण्यासाठी एकत्र येत असताना आम्ही देशाच्या स्वातंत्र्यासोबत सशस्त्र दलातील दिग्गजांच्या योगदानाला देखील साजरे करत आहोत. ॲमेझॉन लष्करी दिग्गजांसाठी प्रबळ फ्रेमवर्क आणि समर्पित उपक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या यशस्वी कॉर्पोरेट करिअर्समधील परिवर्तनाला पाठिंबा देते. एक प्रेरणादायी कथा आहे संदीप खत्री यांची, ज्यांच्या सशस्त्र दलापासून ॲमेझॉन इंडियापर्यंतच्या प्रवासामधून स्थिरता व सर्वोत्तमता दिसून येते. ॲमेझॉनमध्ये अनेक लष्करी दिग्गज नाविन्यतेचे नेतृत्व करत आहेत आणि ग्राहक अनुभवाला उत्साहित करत आहेत. बहुमूल्य अनुभव, कौशल्य व नेतृत्वासह ते विविध भूमिकांमध्ये उत्तम कामगिरी करत आहेत. १९९८ मध्ये करिअरला सुरूवात करत संदीप यांनी त्यांच्या लष्करी सेवेच्या अभिमानी कौटुंबिक वारसाचे जतन केले.

## कायनेटिक ग्रीन द्वारे यूएसडॉलर २५ दशलक्षांची उभारणी

पुणे, - कायनेटिक ग्रीन, इलेक्ट्रिक वाहनांचे अग्रणी भारतीय निर्माता, यांनी घोषित केले की त्यांनी ग्रेटर पॅसिफिक कॅपिटल एक अग्रगण्य जागतिक खाजगी इक्विटी फर्मकडून यूएसडॉलर२५ दशलक्षांची गुंतवणूक प्राप्त केली आहे जो सिरीजए साठी एकूण लक्ष्यित यूएसडॉलर ४० दशलक्षांपर्यंत निधी उभारणीचा एक भाग आहे.

# बिडकीन- शेंद्रा डी एम आय सी मध्ये हजारो तरुणांना मिळणार रोजगार : खा. संदीपान भुमरे

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ ऑगस्ट मागील पाच वर्षांपासून बिडकिन शेंद्रा डीएम आय सी कडे ढुंकूनही न पाहणारे उद्योजक छत्रपती संभाजी नगरचे खासदार बदलताच गुंतवणूक करण्यासाठी छत्रपती संभाजी नगरकडे वळाले आहेत. एथर एनर्जी कंपनीने २०००, कोटीची गुंतवणूक करण्याची घोषणा करून जमीन खरेदी केल्यानंतर त्यांचे पाठोपाठ टोयोटा या जपानच्या मोठ्या कंपनीने देखील येथे २०,०००, कोटीची गुंतवणूक करण्याची घोषणा केली . त्याच बरोबर लुब्रिझोल या लुब्रिकंट निर्मिती करणाऱ्या कंपनीने देखील बिडकीन शेंद्रा डीएम आय सी मध्ये दोन कोटीची गुंतवणूक केली आहे. या पाठोपाठ जे एस डब्लू या मोठ्या ग्रुप ने देखील बिडकीन शेंद्रा डीएम आय सी मध्ये २७,२००, कोटीची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. अश्या विविध ऑटो मोबाईल क्षेत्रातील मोठ्या कंपन्या



बिडकीन शेंद्रा डीएमआयसी मध्ये येत असून त्याच बरोबर अमेरिकेतील एल्डरिच या आय टी कंपनीने देखील शेंद्रा मध्ये शंभर कोटीची गुंतवत केली आहे.असे विविध उद्योग छत्रपती संभाजी नगर मधील बिडकीन शेंद्रा डीएम आय सी मध्ये येत असल्यामुळे लाखो तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याबाबतची माहिती खा. संदीपान भूमरे यांनी दिली.

ते पुढे बोलत असताना त्यांनी सांगितले की बिडकीन शेंद्रा डीएमआयसी मध्ये आतापर्यंत २५७ उद्योगांनी गुंतवणूक केली असून आता पर्यंत ९००० लोकांना रोजगार दिला गेला असून नव्याने आलेल्या उद्योगामुळे जवळ पास एक लाख तरुणांना रोजगाराची संधी निर्माण होणार असल्याचे खा. संदीपान भुमरे यांनी सांगितले. बिडकिन शेंद्रा डीएमआयसी मध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग येत असल्यामुळे छत्रपती संभाजी नगरच्या विमानतळाचा विस्तार करण्याबाबत देखील केंद्रीय पातळीवरून प्रयत्न सुरू केल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच नागरी उड्डाण मंत्री छत्रपती सभाजी नगरच्या विमान तळाच्या विस्तारीकरणासाठी सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करतील त्यासाठी पत्रव्यवहार झाल्याबाबत माहिती खा. संदीपान भूमरे यांनी दिली. एकूणच छत्रपती संभाजी नगरच्या नागरिकांनी खा. भुमरे पालकमंत्री असताना त्यांनी केलेले काम , व त्यांचा शुभ पायगुण अनुभवला आहे. आता खासदार झाल्यानंतर देखील भुमरे कामाचा सपाटा लावला आहे.

# अमृता खानविलकर सादर करत आहे वर्ल्ड ऑफ स्त्री

छत्रपती संभाजीनगर : अमृतकला स्टुडिओ आणि 'अर्थ' एनजीओ प्रस्तुत 'वर्ल्ड ऑफ स्त्री' हा अनोखा नृत्याविष्कार घेऊन अमृता खानविलकर रसिकांच्या भेटीस येण्यास सज्ज झाली आहे. पहिल्यांदाच एखादी अभिनेत्री एका स्वयंसेवी संस्थेसोबत संलग्न होत, नृत्यकलेच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचे अनोखे रूप सादर करणार आहे. यात शृंगार, भक्ती, शक्ती आणि स्त्री तत्त्व यांचा समावेश आहे. आपल्या सहजसुंदर अभिनयाने अमृता खानविलकरने प्रेक्षकांना आपलेसे केले आहे. ती एक उत्कृष्ट नृत्यांगना आहे, हे आपल्याला माहीतच आहे. तिचा नृत्याविष्कार रसिकांनी अनेकदा पाहिला आहे. असाच एक अनोखा नृत्य नजराणा अमृता खानविलकर 'वर्ल्ड ऑफ स्त्री' च्या माध्यमातून घेऊन येत आहे. या निमित्ताने तिचे थेट प्रेक्षकांसमोर नृत्यप्रयोग सादर करण्याचे स्वप्न साकार होत आहे. या नृत्यप्रयोगाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रेक्षकांना क्लासिकल, सेमी क्लासिकल म्युझिक आणि नृत्याची अनोखी मैफल अनुभवयाला मिळणार आहे. या कलाकृतीत स्त्रीशक्ती, महिला सक्षमीकरण, शृंगार, भक्ती यांचे दर्शन घडणार आहे. यात तिच्यासोबत नृत्यदिग्दर्शक कुशल नर्तक आशिष पाटील देखील सहभागी होणार आहेत. या नृत्याविष्काराची मैफल ९० मिनिटांची असून पुढील येणाऱ्या काळात विविध नाट्यगृहात हा प्रयोग होणार आहे. येत्या २४ ऑगस्टला 'वर्ल्ड ऑफ स्त्री' चा पहिला प्रयोग टाटा थिएटर, एनसीपीएमध्ये सादर होणार आहे. अमृता खानविलकर एक अभिनेत्री म्हणून चित्रपटसृष्टीत प्रसिद्ध आहेच पण तिच्या नृत्याविष्काराची एक विशिष्ट बाजू प्रेक्षकांना या निमित्ताने जवळून अनुभवायला मिळणार आहे.

# अप्सरा आईस्क्रीम ५३व्या वर्धापनदिना निमित्त राबविणार 'मुस्कान' उपक्रम

नाशिक : मुंबई येथील देशातील एक सुस्थापित आणि विश्वासप्राप्त ब्रँड असलेल्या अप्सरा आईस्क्रीमने कंपनीच्या ५३व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आज एका नावीन्यपूर्ण उपक्रमाची घोषणा केली. लोकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि स्मितहास्य आणण्यासाठी कंपनी ५३,००० मोफत आईस्क्रीमचे वितरण करणार आहे.'मुस्कान' हा उपक्रम ७८ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्टपासून मुंबई व पुण्यात सुरू होणार आहे. त्यानंतर अन्य शहरांमध्ये टप्प्याटप्प्याने तो सुरू करण्यात येणार आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, या उपक्रमांतर्गत कंपनी ५३,००० आईस्क्रीमचे वितरण करणार आहे.हे सुमारे चार टन आईस्क्रीम आहे. देशातील ९ राज्ये आणि २५ शहरांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येईल. विविध स्वयंसेवी संस्था, अनाथालये, वृद्धाश्रम आणि सरकारी व गैर-सरकारी क्षेत्रांमधील विविध प्रतिष्ठानांमध्ये हे आईस्क्रीम वितरित करण्यात येईल. लायन्स क्लब, लिओ, लायन इंटरनॅशनल, स्वदेस फाऊंडेशन, लिओ इंटरनॅशनल, लिओ क्लब ऑफ अंधेरी अचिव्हर्स, रोटरॅक्ट डिस्ट्रिक्ट, श्री नित्यानंद एज्युकेशन ट्रस्ट यासारख्या आघाडीच्या सामाजिक संस्था देखील या उपक्रमाचा एक भाग होणार आहेत. लोकांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटविणे व त्यांना आनंद देणारा स्कूप वाटणे, हे या उपक्रमाचे लक्ष्य आहे. तसेच, त्यांच्या जीवनात विशेषतः स्वातंत्र्यदिनाच्या शुभ प्रसंगी गोडवा आणणे हाही त्याचा उद्देश आहे.

# दुबार बोगस असलेली नावे मतदार यादीतून वगळावी : सुनील मिरकर

सिल्लोड प्रतिनिधी : सिल्लोड सोयगाव मतदारसंघात २२ हजार ८८३ मतदारांची नावे दुबार बोगस आहेत. बीएलओंकडून (इइज) याची पडताळणी करुन दुबार बोगस असलेली नावे मतदार यादीतून वगळावी, अशी मागणी बोगस मतदारांच्या यादीसह निवेदनाद्वारे भाजप पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे केली आहे.

सिल्लोड- सोयगाव विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात दुबार नावे आहेत.यात बहुतांश नावे ही मुस्लिम समाजाची आहे. एका व्यक्तीचे दोन- दोन तीन-तीन चार,-चार ठिकाणी नावे असल्याने एक व्यक्ती चार चार ठिकाणी बोगस मतदान करण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा परिणाम निकालावरही होऊ शकतो. नुकत्याच पार पडले लोकसभा निवडणुकीत एक खासदार अवघ्या ४८ मतांनी विजयी झालेले आहेत. यामुळे दुबार नावे लोकशाहीसाठी घातक आहे.



**सिल्लोड- सोयगाव विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजाची मोठ्या प्रमाणात दुबार बोगस नावे आहेत.पालकमंत्री अब्दुल सत्तार अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव आणून दोबार बोगस नावे यादीतून कमी करू देत नाही व नवीन बोगस नाव नोंदवत आहे.निवडणूक विभागाने हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे व आम्ही पुराव्यासहित दिलेल्या दुबार नावांच्या यादीची पडताळणी करुन वगळावी.अन्यथा आम्हाला न्यायालयाचे द्वार ठोठवावे लागतील. मंत्री अब्दुल सत्तार बोगस मतदारांवर निवडणूक जिंकत आहे.**

**सुनील मिरकर**
**भाजप जिल्हाउपाध्यक्ष**

मतदान ओळखपत्राला आधार लिंक मोहीमेतही दुबार नावे असलेल्या प्रभागात फक्त ३० - ४० टक्के आधार लिंक करण्यात आलेले आहे. तर उर्वरित प्रभागात ५० टक्यांपेक्षा आधिक आधार लिंक केलेले आहे,असे दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे. ज्या बीएलओंच्या प्रभागात आधार लिंकची कमी टक्केवारी आहे,अशा बीएलओंचे वेतन थांबवून कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पालकमंत्री अब्दुल सत्तार राजकीय दबावातून मतदार यादीत बोगस नावांची नोंद करीत असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पूर्व,मध्य,पश्चिम,फुलंब्री कन्नड व जालना जिल्ह्यातील जालना व भोकरदन विधानसभा मतदारसंघातील मतदारांची नावे या मतदारसंघात आहे, असा आरोप भाजप पदाधिकाऱ्यांनी केला आहे. निवेदनावर माजी आ. सांडू पा. लोखंडे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, शहराध्यक्ष कमलेश कटारिया, मनोज मोरेल्लू, विष्णु काटकर यांच्या सह्या आहेत.

# गुरू परिवारच्या अध्यक्षपदी विजय चांदीवाल तर सचिवपदी पवन पाटणी तर कोषाध्यक्षपदी गौरव कासलीवाल यांची निवड

छत्रपती संभाजीनगर : क्रांतिकारी राष्ट्रसंत समाधीस्त आचार्य तरूणसागरजी महाराज यांच्या प्रेरणेने २००८ मध्ये स्थापन झालेल्या गुरू परिवार औरंगाबाद २०२४ ते २०२६ साठी परम पूज्य क्षुल्लक श्री पर्वसागरजी महाराज याच्या मार्गदर्शना मध्ये व आशिर्वादाने नुतन अध्यक्ष पदी विजय चांदीवाल, सचिव पवन







पाटणी, कोषाध्यक्ष पदी गौरव कासलीवाल यांची निवड करण्यात आली. गुरू परिवार २००८ पासुन धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक व विविध जनकल्याणकारी उपक्रम राबवत आहे. मावळते अध्यक्ष प्रितम पाटणी यांनी मागील ३ वर्षात राबवलेली विविध उपक्रम जसे के वधु-वर परिचय मेळावा, रक्तदान शिबीर, अन्नदान, अनाथ आश्रमाच्या मुलांसाठी भरघोस मदत व समाजासाठी रास दांडिया असे विविध उपक्रम राबविण्यात यांच्या अध्यक्षतेखालील मध्ये राबविण्यात आले. तरी या वर्षी सुध्या नविन उपक्रम राबविण्यात येईल अशी माहिती नुतन कार्यकारिणी दिली. नुतन कार्यकारिणीला सकल जैन समाजानी शुभेच्छा दिल्या.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.व्हि.डी.पाटील दिवाणी व फौजदारी न्यायाधिश क. स्तर कन्नड, न्यायालय क्र. १ जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३२/२०२४.

अर्जदार : १ कमलबाई भ्र. बद्रिनाथ कतारे वयः- ५८ वर्षे, धंदाः घरकाम रा.शरद पवार कॉलनी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर. २ रुपाली भ्र. रविंद्र काथार वय: ४० वर्षे, धंदाः घरकाम रा. घर नं. १७५ जांभई छत्रपती संभाजी नगर जि. छत्रपती संभाजीनगर. ३ योगिता भ्र. गणेश काथार वय: ३७ वर्षे, धंदाः घरकाम रा. नादरपुर जि. छत्रपती संभाजीनगर ४ पल्लवी भ्र. प्रकाश काथार वय-३३ वर्षे, धंदा घरकाम रा. सर्वे नं. ३५, प्लॉट नं. ७१५ बंबाट नगर मारोती मंदिरा जवळ, सातारा परीसर, व्हिटिसी. छत्रपती संभाजीनगर जि. छत्रपती संभाजीनगर. पि.४३१००१ ५ रेणुका भ्र. शिवाजी काथार वय ३० वर्षे, धंदाः घरकाम रा.घर नं. ५४५, चाळिसगांव रोड, जवाहर नवादेय विद्यालय शरद पवार कॉलनी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर. ६ दत्तात्रय पि. बद्रिनाथ कतारे वयः २९ वर्षे, धंदाः खाजगी नौकरी रा. घर नं. बि. ५८० चाळिसगांव रोड, शरद पवार कॉलनी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर. ७ वैभव पि. बद्रिनाथ कतारे वय: २७ वर्षे, धंदाः खाजगी नौकरी रा. घर नं. बि. ५८० चाळिसगांव रोड, शरद पवार कॉलनी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिलहाधिकारी औरंगाबाद.

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन VIII1827 चे कलम २ व ३ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदारांनी या मा न्यायालयात त्याचे वकिल श्री.बि.जे. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र.१ हि अर्जदार क्र. २ ते ७ यांची आई असुन अर्जदार क्र. २ ते ७ हे आपसांत सख्ख्ये बहिण भाऊ आहेत. अर्जदार क्र. चे पती व अर्जदार क्र. २ ते ७ चे वडिल नामे बद्रिनाथ पि. शंकर कतारे हे होते ते दि.९/४/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड शरद पवार कॉलनी येथे राहत्या घरी मृत्यु झालेला आहे. मयत बद्रिनाथ पि. शंकर कतारे यांना अर्जदार क्र. १ ते ७ यांचे शिवाय इतर कोणीही कायदेशिर वारसदार नाहीत. मयताचे नावे असलेली मयताचे नावे असलेली अ मौजे नरसिंगपुर ता. कन्नड येथिल सर्वे नं. १६ मधिल साने गुरुजी गृहनिर्माण सहकारी संस्था म. कन्नड या संस्थेने पाडलेल्या प्लॉट पैकी प्लॉट क्र.३८ क्षे. ११४३.२५ चौ. फुट ज्याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १४४६ तसेच (आ) मौजे कन्नड येथिल सर्वे न. ३२/२ मधिल पाडलेल्या प्लॉट पैकी प्लॉट नं. १० पैकी निम्मा प्लॉट ज्याचे क्षे. लांबी द × उ १७ मी. व रुंदी पु × प ६ मि. एकुन क्षे. १०२ चौ. मी. ज्याचे चतुसिमा पूर्वेस- याच प्लॉट मधिल निम्मा प्लॉट, पश्चिमेस प्लॉट नं. ९ दक्षिणेस- शरद पवार हाऊसिंग सोसायटी उत्तरेस- नियोजित रस्ता याप्रमाणे ३ तसेच मौजे रामपुरवाडी ता. कन्नड येथिल विटा मातिचे घर ग्रामपंचायत मिळकत क्र.३४ क्षे. लांबी × रुंदी १६ × ४३ एकुन क्षे. ६८८ चौ. फुट याप्रमाणे नमुद मिळकती असुन सदर मिळकत्ति बाबत महुसल कार्यालयातिल मयताचे नावाचे नोंदी कमी करून सदर ठिकाणी अर्जदार क्र. १ ते ७ यांची नावे नार्मानर्देशित करावयाची असुन वारस हक्काने अर्जदार यांचे नावाचे नोंदी घ्यावयाच्या आहेत. अर्जदार क्र. १ ते ७ यांना वारसाने त्यांची नावे नोंदी नामनिर्देशित करणे कामी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदारांनी सदरचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आल्यास त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी स्वरुपाने स्वता अथवा आपल्या विधिज्ञां मार्फत उजर सादर करावा. मुदतित उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदारांचे हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारित करण्यात येतिल.

दि. ०७/०८/२४

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिशक

## जाहिर प्रगटन

**मा.ए.आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४५/२०२४. पुढील तारीख १२/०९/२०२४.

अर्जदार :- १. रुख्मणबाई भ्र. मोतीराम पवार, वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. यशोदाबाई भ्र. तोताराम चव्हाण, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सातकुंड तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. ज्ञानेश्वर पिता मोतीराम पवार, वय ३९ वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. योगेश पिता मोतीराम पवार, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री.डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की,

अर्जदार क्रं. १ ही मयत मोतीराम लच्छिराम पवार यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताची विवाहित मुलगी असून अर्जदार क्र. ३ व ४ हे मुले आहे. अर्जदार क्रं. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्रं. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत मोतीराम लच्छिराम पवार यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे मोतीराम लच्छिराम पवार हे दि.०१/०१/२०१० रोजी मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे आजारपणामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ यांना मयत मोतीराम लच्छिराम पवार यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत मोतीराम लच्छिराम पवार हे मौजे कन्नड, ता. कन्नड येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ४ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.२३/०६/२०२४ रोजी मौजे वडनेर तांडा, ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापुर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०८/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२३/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-२४

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक / /२०२३

१. अर्जदार : कडुबा पि. किसन जंगले रा. सारोळा ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विरूध्द

२. गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय सारोळा ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु नोंद अधिनियम १९६९ चे कलम १३ अन्वये अर्जदाराचा अज्ञान मुलगा नामे चि. शिवराज पि. कडुबा जंगले याची दिनांक २३/११/२००८ रोजीची जनमाची नोंद ग्रामपंचायत सारोळा च्या अभिलेखात घेणेसाठी आदेश होणे बाबत.

उपरोक्त विपयी अर्जदार यांनी ॲड एम. जी. देशमुख. यांचे मार्फत अर्जदार यांनी त्यांचा मुलगा यांचे जन्माचे प्रामणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा यांचा जन्म दिनांक २३/११/२००८ रोजी नारोळा येथे झालेला आहे.

अर्जदार यांचा मुलगा याचा जन्म दिनांक २३/११/२००८ रोजी सारोळा येथे झालेला आहे. अर्जदार यांचा मुलगा यांना शिक्षण, शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्रची आवश्यकता आहे.

त्यामुळे तना अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा यांची जन्म

दिनांक २३/११/२००८ रोजीचे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर /आक्षेप असल्याम त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत

मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्याम अर्जदारास त्यांचा मुलगा यांना दिनांक २३/११/२००८ रोजी जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ४/०४/२०२६ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कन्नड तहसिल कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर फोन:- ०२४३५-२२१०२४**

जा.क्र.२०२४/जमा-२./कुळ/कावी-५४० दिनांक १४.०६.२०२४

## जाहिर प्रगटन

सर्व ग्रामस्थ मौजे गणेशपुर (गणेशपुरवाडी) ता. कन्नड जि. औरंगाबाद यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री संतोष रुपचंद महेर रा. गणेशपुर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे गणेशपुर (गणेशपुरवाडी) ता. कन्नड येथील गट नं १३९ मधील ७/१२ वर असलेले संरक्षित कुळ बुधिराम रामसिंग यांचे नावाची नोंद कमी करणे बाबत या कार्यालयास अर्ज देवून विनंती केलेली आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयास आक्षेप दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

तहसीलदार

## महत्वाची कागदपत्र हरवली

**माझे कीर्ती गैबी दराडे या नावाचे १० वी ,१२ वी ची TC, मार्क शिट, सर्टिफिकेट्स ,जात पडताळणी प्रमाणपत्र ,नॅशनॅलिटी प्रमाणपत्र ,व इतर कागदपत्र असलेली बॅग मुकुंदवाडी बस स्टॉप येथून हायकोर्ट N 3 प्रवासादरम्यान हरवली आहे .सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावी .**

**कीर्ती गैबी दराडे**

LIG ,371 **म्हाडा कॉलनी,** N2 **सिडको,**

**औरंगाबाद** - 431006 **मोबा**- 81494 07735

## जाहिर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ. अर्ज.क्रं. १३७/२०२४. पुढील तारीख ०३/०९/२०२४.

अर्जदार : १. साखराबाई भ्र. भिकनराव जंजाळ, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाकी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह. मु. फ्लैट नं. ८ ए - १० जी, नं. २३४/२ सारा परिवर्तन, औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. २. वैभव पिता भिकनराव जंजाळ, वय २८ वर्षे, धंदा व्यापार, रा. वाकी, ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. फ्लॅट नं. ८ सर्व्हे नं. ५४/२ शहा गार्डन रेसीडेन्सी, मु.पो. भगुर पी. टाईप बिल्डींग, भगुर रुरल, नाशिक, ता. व जि. नाशिक. ३. विजय पिता भिकनराव जंजाळ, वय २६ वर्षे, धंदा व्यापार, रा. वाकी, ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. फ्लॅट नं. ८ शाह गार्डन रेसीडेन्सी, नियर सैनिक सोसायटी, विजय नगर, देवळाळी कॅम्प, नाशिक, ता. व जि. नाशिक. ४. कविता भ्र. गणेश दळवी, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. घर नं. १०८ अविष्कार कॉलनी एन- ६, सिडको कॉलनी, एस.ओ. औरंगाबाद. ता. व जि. औरंगाबाद. ५. शिला पिता भिकनराव जंजाळ, वय ३१ वर्षे, धंदा प्राध्यापिका, रा. बाकी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ह.मु. नरसिंह आपर्टमेंट, देवी मंदीर रोड, देवळाली, नाशिक, ता. व जि. नाशिक

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री. डी.एन.चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत भिकन रामचंद्र जंजाळ यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मुले असून अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी असून

अर्जदार क्र. ५ ही अविवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत भिकन रामचंद्र जंजाळ व अर्जदार हे मुळचे वाकी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथील रहिवाशी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे व्यवसाया निमित्त मौजे नाशिक येथे राहत असतांना मयत भिकन रामचंद्र जंजाळ हे दि.१५/०५/२०२१ रोजी एस.एम.बी.टी. हॉस्पिटल नंदी हिल्स, धामणगांव ता. इगतपुरी जि. नाशिक येथे मरण पावले आहे. तसेच मयताची आई अनुसयाबाई रामचंद्र जंजाळ ही मौजे वाकी ता. कन्नड येथे मरण पावली आहे. अर्जदार क्र. १ व ५ यांना मयत भिकन रामचंद्र जंजाळ यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय, बँकेत व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ व ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ व ५ हे व मयत नामे भिकन रामचंद्र जंजाळ हे मौजे वाकी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथील मुळचे रहिवाशी होते. सदरील मयतास अर्जदार क्र. १ व ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.२५/०६/२०२४ रोजी मौजे वाकी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०८/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिशक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

संचिका क्र. २०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मू. नोंद/सी.आर /२०२४

दिनांक : ०९/०८/२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती लताबाई ज्ञानेश्वर डिके रा. पिंपरखेडा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर,

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय मालुंजा खु ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचे पती नामे ज्ञानेश्वर अंबादास डिके यांचा मृत्यु दिनांक २३/०९/१९९९ रोजी मौजे मालुंजा खु ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय मालुंजा खु ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०९/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक :- ०९/०८/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

## कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभाग :- वैशिष्टपुर्ण योजना, जा.क्र./न.पा./ २४६७/२०२४-२५ दिनांक १३/८/२०२४

### ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सन २०२३-२४

**मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली (दुरध्वनी क्र. ०२४५६-२२१७२७) ई-मेल coud.hingoli@maharashtra.gov.in अनुभवी किंवा नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन वैशिष्टपुर्ण अनुदान योजना अंतर्गत सन २०२४-२५ एकुण ०१ कामांकरीता निविदा कंत्राटदाराकडुन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे ई-टेंडरींग पध्दतीने दिनांक २२/०८/२०२४ वेळ संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत एकुण ०२ कामाच्या निविदा मागवित आहे. निविदा विषयी तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल http://mahatenders.gov.in व दिनांक १४/८/२०२४ रोजी संपुर्ण माहिती व अटी व शर्तीसह सकाळी ११.०० वाजता पासुन पहावयास मिळेल.**

| | |
|---|---|
| (सही/-) | (सही/-) |
| नगर अभियंता | मुख्याधिकारी |
| हिंगोली नगरपरिषद, हिंगोली | हिंगोली नगरपरिषद, हिंगोली |

# परतुर-मंठा विधानसभा मतदारसंघात भाऊगर्दीतही सुरेश जेथलियांना पक्ष श्रेष्टींकडुण ग्रीण सिंग्नल?

**तभा वृत्तसेवा**
**जालना / सुरेश कवडे पाटील**

नुकत्याच लोकसभा निवडणुका झाल्यानंतर आत्ता तोंडावर विधानसभा निवडणुका जवळ आल्याने परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातून अनेक नौसे , हौसे सह काही दिग्गज नेते कॉग्रेस पक्षाकडुण उमेदवारीसाठी इच्छुक आहेत . या ना त्या नेत्याकडे आपण केलेल्या कार्याच्या माध्यमातून कार्य अहवाल सादर करत स्वतः करिता उमेदवारीसाठी वरिष्ठ नेतेमंडळींना साकडे घालताना दिसत आहेत . तर गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष करत अनेक अपयश पचवत कॉग्रेस पक्षात एकनिष्ठ राहत तसेच अनेकांची मदत करत असतात असे नाव म्हणजे सुरेश कुमार जेथलिया हेच नाव


कॉंग्रेस पक्षातील पक्ष निरिक्षक तसेच पक्षातील जेष्ठ नेते तथा कॉग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी काल झालेल्या छत्रपती संभाजीनगर येथील जाहीर सभेत बोलत आसताना अचानक सुरेश जेथलिया हे नाव घेत ईथे जेथलियांचीच चालते ईकडे सुरेश जेथलिया यांचेच नाव चालते म्हणत एक प्रकारे आघामी विधानसभा निवडणुकीत परतुर - मंठा विधानसभेच्या उमेदवारीसाठी कॉग्रेस पक्षाकडुण माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांना ग्रिन सिग्नल मिळाला आसल्याचे बोलले जाते . तसेच त्यांचा तो व्हिडीओ सध्यातरी शोषल मिडीयावर मोठया प्रमाणावर व्हायरल होताना दिसत आहे . यावर अनेकांनी माजी आमदार जेथलिया यांना पसंती दिली आहे .

# महसूल पंधरवडा अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्ती व व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महसूल विभागामार्फत राज्यात महसूल पंधरवडा-२०२४ साजरा करण्यात येत आहे. त्या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनमध्ये आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम आज आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशीकांत हदगल, उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा संघटक (स्काऊट) केसरसिंग पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमांतर्गत अग्निशमन अधिकारी माधव पानपट्टे यांचे मार्फत जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता प्राथमिक आगीपासून बचाव बाबत मार्गदशन करण्यात आले. या अंतर्गत मुलांमध्ये प्रथम - नितीन दिलीप पवार , द्वितीय - आकाश रामेश्वर


राठोड, तृतीय - मोहित चरणसिंग मेहेर मुलींमध्ये प्रथम - गिता रामेश्वर राठोड, द्वितीय - अंजली दत्ताध लघुखरे, तृतीय - प्रिती समाधान शिंदे तसेच पुर परिस्थिती, आग, वीज पडणे, सर्पदंश, वज्राघात, भूकंप आदी विविध आपत्तीमध्ये काय करावे, काय करु नये याबाबतचे माहितीपत्रक वितरीत करण्याात आले. सदर कार्यक्रमामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेस स्काऊट गाईड विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### मुख्यमंत्री -माझी लाडकी बहिण योजना बँक खाते आधार सिडींग करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील मुख्यमंत्री -माझी लाडकी बहिण योजनेकरीता अर्ज केलेल्या सर्व लाभार्थीना जाहिर आवाहन करण्यात येते की, आपण अर्जात नमूद केलेले बँक खाते हे आधार सिडेड आहे की नाही, याची खात्री करुन घ्यावी. बँक खात्याला आधार सिडींग केलेले नसल्यास तात्काळ आपले खाते ज्या बँकेत आहे अशा बँकेत जाऊन आधार सिडींग करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. डिबीटीद्वारे थेट लाभ हस्तांतरणासाठी सदरची बाब अनिवार्य आहे. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत या योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याची मुदत आहे. ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज केला तरी सर्व पात्र लाभार्थीना जुलै -२०२४ पासून दरमहा १५००/- रुपये लाभ मिळणार आहे.१ जुलै ते ३१ जुलै २०२४ पर्यंत अर्ज केलेल्या पात्र लाभार्थीना १७ ऑगस्ट रोजी थेट डिबीटीद्वारे त्यांच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट असे दोन महिन्यांचा लाभ जमा होणार आहे. १ ऑगस्ट ते ३१ऑगस्ट दरम्यान प्राप्त अर्जाची छाननी होऊन सप्टेंबर २०२४ अखेर पर्यंत पात्र लाभार्थींना योजनेचा लाभ देण्यात येईल.





**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ज्ञानसागर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सिपोरा अंभोरा शाळेत शालेय मंत्री मंडळ निवडणूक १०ऑगस्ट रोजी पार पडली त्या निवडणुकीची मतमोजणी आज दिनांक १२ऑगस्ट रोजी झाली त्यात ५ते ७गटातून झालेल्या ४००मतदानापैकी अक्षदा संतोष अंभोरे या ७वी च्या विदयार्थीनीने ९२मतं घेऊन ८उमेदवारामधून बहुमत मिळवून उपमुख्यमंत्री पदाची माळ घेतली तसेच ८वी ते १२वी गटातून झालेल्या एकूण मतदान ५२४पैकी १७३मतं मिळवून महेश एकनाथ सुरुशे याने मुख्यमंत्री पदाची तर प्रतीक संदीप मिसाळ याने ५२४पैकी १४०मतं मिळवून उपमुख्यमंत्री पदाची शर्यत जिंकली. निवडणुकीत विजयी उमेदवारांची नावं ज्येष्ठ शिक्षक श्री सोरमारे सर यांनी घोषित केले विद्यार्थ्यांचे व मतप्रक्रियेत सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल श्री भवर सर यांनी सर्वांचे आभार मानले, यावेळी शाळेचे प्राचार्य श्री दिवटे एस टी सर यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकवृंद /शिक्षिका /शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते सर्वांनी विजयी उमेदवार यांचे अभिनंदन व कौतुक केले.

### स्वातंत्र्य दिनानिमित्त मुस्तकीम हमदुले फाउंडेशनतर्फे उद्या रक्तदान शिबिर

**मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे-शेख शकील**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



स्वातंत्र्य दिनानिमित्त मुस्तकीम हमदुले फाउंडेशन, जमियत- ए- उलेमा जालना, चार्ली ग्रुप जालना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते रात्री ७ या वेळेत जुना जालना भागातील सरस्वती भुवन विद्यालयाच्या पाठीमागील झमझम हॉस्पिटलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्यात मोठ्या संख्येने सहभाग घेऊन रक्तदान करावे, असे आवाहन माजी नगरसेवक तथा समाजसेवक शेख शकील लालमिया यांनी केले आहे.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन आ. कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक मुस्तकीम हमदुले हे राहणार आहेत. गेल्या ९ वर्षापासून स्वातंत्र्य दिनानिमित्त शिबिराचे आयोजन केले जात आहे. एका जणाच्या रक्तदानाने तीन जणांचे प्राण वाचू शकतात. रक्तदान करून माणुसकीचा परिचय द्यावा आणि कोणाचा तरी जीव वाचवण्याचा उत्तम माध्यम बना, असे आवाहन शेख शकील ललमिया आणि मुस्तकीम हमदुले फाउंडेशन, जमियत- ए- उलेमा जालना, चार्ली ग्रुप जालना यांच्यावतीने करण्यात आले आहे. या वर्षीपासून रक्तदान शिबिरात महिलांसाठी पडद्यासह विशेष व्यवस्था करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे.

# कास्ट्राईब चे जिल्हा कचेरीसमोर धरणे आंदोलन; चव्हाण, गोरंट्याल यांच्या भेटी, मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमधील आरक्षण तात्काळ लागू करावे, या सह विविध मागण्यांबाबत कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष विनोद भगत यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी ( ता.१३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. सकाळी ११ वा. धरणे आंदोलनास प्रारंभ झाला. माजी आ. अरविंदराव चव्हाण, युवा नेते अक्षय गोरंट्याल यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवला.आंदोलनात जिल्हाध्यक्ष विनोद भगत, जिल्हा सरचिटणीस विलास कोमटवार, राजेश सदावर्ते ,पंजाब खिल्लारे , राजेंद्र शिंदे, रवींद्र मगरे, संजय चव्हाण ,सनी कटकम, गजानन मगर ,अनिल भेरे, गोविंद इंगळे, नितीन श्रीमंगले, आबेद कुरेशी, राजू पवार ,राम पवार ,रंजना मालेवाड, मीना जाधव ,रेणुका बोधुल, राहुल लालझरे ,रामेश्वर कुबेर ,सचिन साळवे, अनिल एडके, रामेश्वर जावळे, प्रदीप पाचपोहे ,मुकुंद महाजन, पारस अहम महिंद्रकर ,एस.जी.आडणे, रमेश पैठणकर, ए.पी.दांडगे, श्रीराम कोकाटे, नरेंद्र जोशी ,पी.आर.गायकवाड, संजय सिंगल, मोहन कदम ,एस.डी.सोनवणे, मंगेश देशपांडे ,आशा आढाव, गणेश पोटे ,संगीता फुलारी, आर. जे. चव्हाण, एस. एस. दाणेकर ,डि.एन.खलसे, एम.पी .जाधव, ए. आर. जाधव ,एस.पी .बाविस्कर ,एस.एस. अंभुरे, व्ही. एस .घनवटे ,एम.एस .घुले, एस .एस.पारवे ,एम .आर .जाधव, पी. एम .उल्लेवाड ,जी.एस.मगर, आदींनी सहभाग नोंदवला. यावेळी कर्मचाऱ्यांनी अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांची भेट घेऊन त्यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संघटनेच्या वतीने निवेदन पाठवण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाने दि. ०७ मे २०२१ च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीयांच्या पदोन्नत्यांना अडथळा निर्माण केला असून भारतीय संविधानातील तरतुदीनुसार अनुसूचित जाती ,जमाती, इतर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती, सरळ सेवा भरती मध्ये दिलेल्या सवलतीस अनुसरून सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नती रोखता येणार नाही असे स्पष्ट निर्देश दिलेले असतांनाही महाराष्ट्र शासनाने अद्याप पदोन्नती बाबत निर्णय घेतला नाही. आरक्षणाची रिक्त पदे न भरणे हे संविधान विरोधी असून राज्यात कंत्राटी भरती धोरण अमलात आणल्यामुळे लाखो बेरोजगारांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण झाला आहे .असे नमूद करत कंत्राटी नोकर भरती धोरण रद्द करून सरळ सेवा भरती मधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढावा, जुनी पेन्शन योजना लागू करावी अशा मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. मागण्या मान्य न झाल्यास मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी झालेल्या धरणे आंदोलनात पशुसंवर्धन संघटना, जि .प .लिपिक वर्गीय कर्मचारी, महसूल कर्मचारी, जि .प.लेखा कर्मचारी, वनविभाग अशा विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधी आंदोलन स्थळी भेट देऊन कास्ट्राईब कर्मचारी महासंघाला पाठिंबा दर्शविला.

# सागर मेघावालेचा भास्कर आबा दानवेंनी केला सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आपली परिस्थिती कितीही हलाखीची असली तरी, तिच्यावर मात करण्याची ताकद तुमच्या ज्ञान आणि शिक्षणात असते. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर वडिलांसोबत चहा विकणारा तरुण सागर मेघावाले याने सीएच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश मिळवले आहे, यावेळी जालना विधानसभा प्रमुख श्री भास्कर आबा दानवे यांनी शाल-पुष्पगुच्छ देऊन सागरचा सत्कार करून विशेष अभिनंदन केले.

आई- वडिलांसोबत चहा विकून सागर ने प्रतिकूल परिस्थितीत उदरनिर्वाह करीत सीएचा अभ्यास केला आणि जिद्दीच्या जोरावर तिसऱ्या प्रयत्नात सीए बनला. भास्कर आबा दानवे यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक करुन सागरला शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी सत्कार मूर्ती सागर संतोष मेघ-ावाले, भाजप ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष सोमेशजी काबलीये, संजय डोंगरे, सिद्धिविनायकजी मुळे, गंभीरराव पाडोळ, विठ्ठल नरवडे, सुनीलजी खरे, रमेशजी नंद, तुळजेशजी चौधरी, योगेशजी जंगडे उपस्थित होते.

# मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना समितीच्या अध्यक्षपदी सतीश घाटगे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



महायुती सरकारने आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरु केली आहे.या योजनेचा लाभ शेवटच्या गरीब महिलापर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने विधानसभा क्षेत्रनिहाय समिती तयार केली आहे.त्यानुसार घनसावंगी विधानसभेच्या समितीच्या अध्यक्षपदी समृद्धी कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांची यांची शासनाने निवड केली आहे.या निवडीचे सर्व जनतेने स्वागत केले आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना राज्यात लोकप्रिय ठरली आहे.या योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपये जमा होणार आहेत.विवाहित,विधवा,घटस्फोटित,परित्यक्ता आणि निराधार महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिला भगिनींना मिळावा यासाठी घनसावंगी विधानसभेसाठी शासनाने समिती गठीत केली असून या समितीच्या अध्यक्षपदी सतीश घाटगे पाटील यांची निवड मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे.घनसावंगी विधानसभेतील एकही लाडकी बहिण या योजनेपासून वंचित राहणार नाही,हा माझा सर्व भगिनींना शब्द आहे.या योजनेची अंमलबजावणी युद्धपातळीवर करण्यात येईल.या योजनेसंदर्भात कोणतीही अडचण भासल्यास अंबड व घनसावंगी येथील जनसेवा कार्यालयाशी संपर्क साधावा.अर्ज सादर न करू शकलेल्या महिलांचा गावात जाऊन अर्ज भरून घेण्यात येईल.त्यामुळे महिलांनी निश्चिंत राहावे....सतीश घाटगे पाटील,लाडकी बहिण योजना अध्यक्ष,घनसावंगी विधानसभा

# १७ ऑगस्टला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे तीन हजार रुपये जमा होणार -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**



भारतीय जनता पक्ष सच्च्या कार्यकर्त्यांच्या बळावर मोठा झालेला पक्ष आहे. पक्षातील प्रत्येक कार्यकर्ता पक्षाची ताकद आहे.कार्यकर्त्यांना 'मेरा बुथ सबसे मजबूत, मेरी पार्टी सबसे मजबूत' हे उद्दिष्ट्ये ठेवून कार्य करण्याचा मंत्र दिला. 'संघटना मजबूत करण्यासाठी माणसांना जोडणे आवश्यक आहे.

त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या दृष्टीने काम करणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत. या सर्व योजना शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने काम करा. गोरगरीबांची सेवा करण्याची भावना ठेवा. स्वत:ची जबाबदारी लक्षात घेऊन संघटना बांधणीचे काम करा अशा सूचना आज महाराष्ट्राचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित भाजपा कार्यकर्त्यांना दिल्या. दहिफळ खंदारे ता.मंठा येथील दलित वस्ती अंतर्गत सामाजिक सभागृहाचे उद्घाटन (किंमत १० लाख रुपये), वॉटर ग्रीड अंतर्गत ८४ हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाच्या भूमिपूजन, गावठाण अंतर्गत २ नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे (किंमत ४ लक्ष रु) व प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना, अहिल्यादेवी होळकर आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना व रमाई आवास योजना अंतर्गत मंजूर असलेल्या घरकुलांच्या कार्यारंभ आदेश वाटप, किर्ला ता. मंठा येथे ६८ हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाचे लोकार्पण, गावठाण अंतर्गत १ नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे (किंमत २ लक्ष रु) व प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना, अहिल्यादेवी होळकर आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना व रमाई आवास योजना अंतर्गत मंजूर असलेल्या घरकुलांच्या कार्यारंभ आदेश वाटप सरहद्द वडगाव ता.मंठा येथे अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर (किंमत १० लाख रुपये), जिल्हा परिषद दलितवस्ती अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन (किंमत ४ लाख रुपये), मारुती मंदिर सभागृह लोकार्पण सोहळा, गावठाण अंतर्गत २ नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे (किंमत ४ लक्ष रु) व प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना, अहिल्यादेवी होळकर आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना व रमाई आवास योजना अंतर्गत मंजूर असलेल्या घरकुलांच्या कार्यारंभ आदेश वाटप आणी कोकरंबा ता.मंठा येथे आगमन व दलित वस्ती अंतर्गत सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन (किंमत १० लक्ष रुपये), जिल्हा परिषद दलितवस्ती अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन (किंमत ४ लाख रुपये), गावठाण अंतर्गत २ नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे (४ लक्ष रु) व प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना, अहिल्यादेवी होळकर आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना व रमाई आवास योजना अंतर्गत मंजूर असलेल्या घरकुलांच्या कार्यारंभ आदेश वाटप कार्यक्रम आज महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले यावेळी ते बोलत होते.

# कॉंग्रेस पक्ष हा जसामान्यांचा पक्ष -माजी आ.सुरेशकुमार जेथलिया

**तभा वृत्तसेवा**
**परतूर /प्रतिनिधी**

कॉंग्रेस पक्ष हा जाणसामान्य जनतेचा पक्ष असून ह्याच पक्षात युवकांना भविष्य असून राज्यात महाविकास घाडीची सत्ता अटळ असल्याचे प्रतिपादन मा.आ. सुरेशकुमार जेथलिया यांनी केले. परतूर येथील त्यांच्या जणसंपर्क कार्यालयात बाबूलतारा येथील युवकांचा कॉंग्रेस पक्षात प्रवेश झाला.यावेळी प्रमुख पाहुण्यात कॉंग्रेस तालुकाप्रमुख बाबासाहेब गाडगे, जिल्हा परिषद सदस्य इंद्रजित घनवट,लक्ष्मण शिंदे, शाकेर मापेगावकर, दत्ता अंभुरे , अनंता भारसाखळे , प्रवीण डुकरे, विभागध्यक्ष गणेश काळे आदींची उपस्तिती होती.

यावेळी आपल्या मार्गदर्शनात ते पुढे म्हणाले कि दिशाहीन पक्षावर विश्वास ठेवत अनेक युवाकांची आजवर फसगत झाली आहे. मात्र अलीकडे युवा मंडळी देखील जागृता झाली आहे. कॉंग्रेस पक्ष हा युवकाना, देशाला



दिशा देणारा पक्ष असून सर्व जातीचा सन्मान करणारा पक्ष म्हणून कॉंग्रेस कडे पाहिले जाते. येणाऱ्या विधान सभा निवडणुकीत सत्तान्तर अटळ असून महाविकासआघाडी सत्तेत येणार आहे . कार्यकर्त्यांनो जोमाने कामाला लागा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान यावेळी वलखेड येथील परमेश्वर बिल्लारे, बाबुरातारा येथील सोमनाथ शाहुराव काळे, शरद हरिभाऊ देवकर, लक्ष्मण बाबासाहेब मुळे, अजय श्रीराम वाघमारे, अविनाश पंढरीनाथ मखर, योगेश सुभाष काळे, शंकर महादेव मुळे, रामेश्वर श्रीरंग नाईकवाडे सह अनेक युवकांनी मा.आ.सुरेशकुमार जेथलिया, नितीन जेथलिया, बाबासाहेब गाडगे, इंद्रजित घनवट यांच्या नेतृवावर विश्वास ठेवत कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी प्रमुख नेत्यांच्या हस्ते पक्षाचे रुमाल व हार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण डुकरे तर सूत्रसंचालन इंद्रजित घनवट तर आभार गणेश काळे यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने कॉंग्रेस कार्यकर्त्यांची उपस्तिथी होती.

## १०१ जालना विधानसभा क्षेत्रासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना शासकीय समिती गठीत

# अध्यक्ष म्हणून अर्जुनराव खोतकर यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना एक जुलै २०२४ पासून सुरू झाली असून महिलांच्या आर्थिक र् स्वतंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणांमध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. एकनाथरावजी शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडवणीस, मा.ना. अजित दादा पवार यांनी ही योजना सुरू केली आहे.

या योजनेचे सनियंत्रण व आढावा घेण्याकरिता विधानसभा क्षेत्रा करिता समिती गठीत करणे बाबत मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाप्रमाणे मा. पालकमंत्री मा.ना.अतुलजी सावे साहेब यांनी महिला व बालविकास विभागाकडे शिफारस केल्याप्रमाणे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जालना विधानसभा मतदारसंघासाठी अशासकीय समितीचे अध्यक्ष म्हणून उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर यांची निवड करण्यात आली .

शासन निर्णय महिला बालविकास विभाग निर्णय संकीर्ण २०२४ प्र.क्र. ९६ / का-२/मंत्रालय मुंबई दिनांक २५ जुलै २०२४ नुसार जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण



पांचाळ यांनी दिनांक १३ ऑगस्ट २०२४ १०१ जालना विधानसभा मतदारसंघासाठी समिती गठीत केली. अध्यक्ष म्हणून शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर व दोन अशासकीय सदस्य, तहसीलदार जालना, आयुक्त महानगरपालिका जालना ,गटविकास अधिकारी जालना,बाल विकास प्रकल्प अधिकारी जालना, यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या निवडीमुळे शिवसेना उपनेते नेते अर्जुनरावजी खोतकर यांनी मुख्यमंत्री मा.ना. एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडवणीस, साहेब ,मा. ना. अजितदादा पवार ,व महिला व बालविकास मंत्री आदिती आदिती तटकरे, पालकमंत्री मा. ना. अतुलजी साहेब यांचे आभार व्यक्त केले .या निवड झाल्यामुळे सर्व स्तरातून अर्जुनरावजी खोतकर यांच्यावर शुभेच्छा होत आहे व अभिनंदन केले जात आहे .

## अग्रलेख...

# दिवस सुगीचे सुरु जाहले...

केंद्रात मोदी सरकारचे तिसरे पर्व सुरू होण्याची स्पष्ट सुचिन्हे दिसू लागली त्याच दिवशी देशाच्या कृषी क्षेत्राला दिलासा देणारी आणि संपूर्ण देशाला समाधानाचा अनुभव देणारी एक बातमी केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालयाकडून प्रसृत करण्यात आली. अगोदरच्या पाच वर्षांच्या अन्नधान्य उत्पादनाच्या आकडेवारीस मागे टाकून यंदाच्या खरीप, रबी आणि उन्हाळी हंगामातील एकूण अन्नधान्य उत्पादन विक्रमी असेल, असे या खात्याने जाहीर केले होते. गेल्या पाच वर्षांतील अन्नधान्य उत्पादनाच्या सरासरीपेक्षा यंदाचे उत्पादन तब्बल २११ लाख टनांनी अधिक असेल, हा या खात्याने वर्तविलेल्या अंदाजास पुढच्या दोन महिन्यांत पुरेशी पुष्टी मिळाली. निसर्गानेदेखील या भाकितास साथ देण्याचे ठरविल्यामुळे पेरणीचा हंगाम समाधानकारकपणे पूर्ण झाला आहे. देशातील वेगवेगळ्या राज्यांच्या कृषी खात्यांकडून केंद्रास प्राप्त झालेल्या माहितीच्या संकलनानुसार, यंदा एकूण ३२८९ लाख टन अन्नधान्य देशाच्या मातीत पिकणार असून यापैकी तांदूळ आणि गहू यांच्या उत्पादनाचा वाटा सुमारे २६०० लाख टन एवढा असणार आहे. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून भरड धान्याच्या प्रसार आणि लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी आणि जनतेने या अन्नाचा वापर आहारात करावा यासाठी अनेक योजना आखण्यात आल्या. 'श्रीअन्न' या नावाने नवी ओळख मिळालेल्या या भरड धान्यांस आज देशात प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. तेलबिया आणि डाळींचे एकत्रित उत्पादन सुमारे दीडशे लाख टन असेल, तर श्रीअन्नाचे उत्पादन त्याहूनही अधिक, म्हणजे सुमारे पावणेदोनशे लाख टनांएवढे असेल, असा अंदाज आहे. शहरीकरण व औद्योगीकरणासारख्या कारणांमुळे शेतीचे क्षेत्र घटत असल्याच्या बातम्या वारंवार येत असतात. यंदा मात्र, पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात १८ दशलक्ष हेक्टरची वाढ झाल्याची सुवार्ता असल्याने पुन्हा एकदा शेतीला सुगीचे दिवस येण्याच्या संकेतांची सुरुवात दृष्टिपथात आली आहे. केंद्र सरकारच्या शेतीविषयक धोरणात्मक उपाययोजना आणि केंद्रीय अर्थसंकल्पातील कृषीविषयक तरतुदींचा सकारात्मक परिणाम कृषी क्षेत्रात दिसू लागला आहे, असे म्हणता येईल. शेतीयोग्य जमिनीचा वापर अन्य कारणांकरिता केला जाऊ नये याकरिता राज्य सरकारांना केंद्र सरकारकडून केल्या गेलेल्या आवाहनाचा सकारात्मक परिणाम दिसू लागला आहे. क्षार किंवा अन्य जैविक कारणांमुळे पिके घेण्याची क्षमता कमी झालेल्या जमिनींचा शेतीव्यतिरिक्त अन्य कारणांकरिता वापर करण्याचा केंद्र सरकारचा सल्ला अनेक राज्यांतील शेतकऱ्यांनी मनावर घेतलेला दिसतो. असंख्य विवंचनांनी घेरलेल्या शेतकऱ्याच्या जीवनात समाधानाचे आणि सुखाचे दिवस सुरू होण्याच्या पर्वाची ही नांदी म्हणावी लागेल. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात शेतीयोग्य क्षेत्रामध्ये ५० लाख हेक्टरने वाढ झाल्याचे केंद्र सरकारच्या आकडेवारीवरून दिसते. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या मध्यप्रदेशाने कृषी क्षेत्रातील वाढीच्या स्पर्धेत मारलेली बाजी महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. या राज्यातील कृषी क्षेत्राने गेल्या पाच वर्षांत १७१ लाख हेक्टरवरून ३०० लाख हेक्टरपर्यंत वाढीचा पल्ला गाठला आहे. कृषी क्षेत्राच्या आणि पर्यायाने देशातील शेतकऱ्याच्या भविष्याचे चांगले संकेत सुरू झाल्याची जाणीव करून देणारी ही आकडेवारी निश्चितच महत्त्वाची म्हणावी लागेल.

शेतकऱ्यांच्या आयुष्यात समृद्धी आणण्यासाठी बियाणांपासून बाजारपेठांपर्यंतच्या प्रक्रियेत केंद्र सरकारच्या विविध योजना कशा पूरक ठरत आहेत, याची जाणीव आता शेतकऱ्यांस होऊ लागली आहे, हे एक सुचिन्ह म्हणावे लागेल. रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजधानी दिल्लीत केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांच्या समवेत भारत कृषी संशोधन संस्थेच्या माध्यमातून देशातील जमिनीच्या वाणास आणि हवामानास अनुकूल ठरणाऱ्या व जैवसंवर्धन केलेल्या पिकांच्या १०९ वाणांचे वितरण केले. पिकांचे हे नवे वाण देशाच्या शेती क्षेत्राच्या उत्पादन खर्चात बचत करण्याकरिता महत्त्वाचे ठरेल, या पंतप्रधानांच्या विश्वासाला देशातील शेतकऱ्यांकडून मिळणारा प्रतिसाद अशा उपक्रमांतून प्रतिबिंबित होतो. केवळ शेतकरीच नव्हे, तर जनतेकडूनही केंद्र सरकारच्या प्रयत्नांस कळत-नकळत मिळणाऱ्या प्रतिसादामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात आणि आहारशैलीत होणारा बदल महत्त्वाचा म्हणावा लागेल. अलिकडे मोठ्या प्रमाणावर रासायनिक प्रक्रिया केलेल्या किंवा आरोग्यास लाभदायक न ठरणाऱ्या खाद्यपदार्थांपासून दूर राहण्याबाबत जनतेमध्ये चांगल्या जागृतीची चिन्हे दिसू लागली आहेत. झटपट आहाराचे दुष्परिणाम म्हणून स्थूलपणा, मधुमेह, रक्तदाबासारख्या विकारांचा विळखा वाढत असताना जीवनशैलीमध्ये होणारे हे बदल काहीसे संथ असले, तरी सकारात्मक असल्याने कृषिप्रधान भारताचा मूळ चेहरा पुन्हा एकदा प्राप्त करण्याच्या प्रयत्नांना यश येण्याची सुचिन्हेही दिसू लागली आहेत. नैसर्गिक शेतीचे फायदे आणि सेंद्रिय शेतीबद्दल वाढता विश्वास ही या सुचिन्हांचीच चाहूल आहे. आता यात भर घालून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी कृषी संशोधन क्षेत्र पुढाकार घेईल आणि देशात विकसित होणाऱ्या नव्या पिकाच्या वाणाची माहिती दर महिन्याला शेतकऱ्यास दिली जाईल. वापरात नसलेली पिके व अन्नधान्ये पुन्हा आहारशैलीच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे हे प्रयत्न म्हणजे केवळ शेतकऱ्याच्या नव्हे, तर एकूणच समाजाच्या जीवनशैलीतील आरोग्यवर्धक क्रांती ठरणार आहे.

देशातील शेतीचे उत्पादन वाढविण्याकरिता होणाऱ्या रासायनिक खतांच्या वापराबद्दल चिंता व्यक्त होत असताना होणारे हे सकारात्मक बदल सध्याच्या ग्लोबल वॉर्मिंग आणि वातावरणातील बदलांच्या जागतिक प्रतिकूल परिणामांशी सामना करण्याकरिता साह्यभूत ठरावेत, अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. कारण भावी पिढ्यांच्या आरोग्यासाठी आपणच जबाबदार आहोत, ही भावना रुजविण्याचे काम या माध्यमातून सुरू झाले आहे. रासायनिक शेतीव्यतिरिक्त नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, प्राधान्य देण्याची गरज दोन्ही बाजूंनी अधोरेखित होऊ लागली आहे. नैसर्गिक शेतीला अनुदान देण्याचा मुद्दाही केंद्र सरकारच्या विचाराधीन असल्याचे गेल्या महिन्यात कृषिमंत्र्यांनी शेतकरी मेळाव्यात बोलून दाखविले होते. देशातील जनता रसायनविरहित अन्नधान्याची प्रामाणिक प्रतीक्षा करत आहे. त्याकरिता अधिक किंमत देण्याची लोकांची तयारी असते. नैसर्गिक शेतीमुळे पिकांचे उत्पादन कमी होईल असा गैरसमजही दूर होऊ लागला आहे. त्यामुळे जे शेतकरी तीन वर्षांत आपल्या शेताचा काही हिस्सा निव्वळ नैसर्गिक शेतीच्या लागवडीकरिता राखून ठेवतील त्यांना अनुदान द्यावे, असा केंद्र सरकारचा विचार आहे. तसे झाले तर नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन मिळेल व रसायनविरहित अन्नधान्याच्या उत्पादनाचे प्रमाण वाढून आरोग्यापुढील आव्हानांशी सामना करण्याचे शारीरिक बळ समाजास मिळेल. नैसर्गिक शेतीतून पिकविलेल्या अन्नधान्य, भाजीपाला आणि फळांना दीडपट भाव देण्याची योजनाही कृषिमंत्र्यांनी उघड केली होती. ती प्रत्यक्षात आली, तर कृषी क्षेत्राच्या नव्या वाटा जीवनशैलीच्या क्रांतीच्या वाटा ठरतील. या योजना प्रत्यक्षात आणण्याकरिता नैसर्गिक शेतीच्या प्रसारावर भर द्यावा लागेल, शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती करावी लागेल आणि अशा पिकांतून मिळणारे उत्पन्न जीवनमान सुधारण्यास साह्यभूत ठरेल, असा विश्वास रुजवावा लागेल. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावून त्यांना आत्मनिर्भर करण्याकरिता आणि शेती या व्यवसायाची हरवत चाललेली प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करण्याकरिता नव्याने प्रयत्न करण्याची गरज आहेच. केंद्र सरकार त्यासाठी काही ठोस पावले उचलत आहे, ही समाधानाची बाब आहे. शेती हा केवळ शेतकऱ्यांच्या हिताचा आणि त्यांच्या आयुष्यात समृद्धी समाधान आणण्यापुरता मुद्दा नाही. देशातील जनतेच्या एकूणच आरोग्य आणि आहारशैलीमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी हे बदल आवश्यक आहेत. केंद्र सरकारच्या नव्या प्रयत्नांमुळे कृषी क्षेत्रात सुरू झालेले हे सुगीचे दिवस भविष्यातील नव्या क्रांतीची नांदी ठरोत आणि शेतकऱ्यांबरोबरच सामान्य जनतेच्या जीवनातही या सुगीचे समाधान प्रतिबिंबित होवो, अशा अपेक्षा अनाठायी ठरणार नाहीत.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# फ्रान्समधील मॅक्रॉन यांचा फसलेला डाव

फ्रान्समध्ये पहिल्या फेरीचे मतदान ३० जून २०२४ रोजी पार पडले. त्यामध्ये अतिउजव्या नॅशनल रॅलीला (आरएन) त्यांच्या मित्रपक्षांसह सर्वात जास्त म्हणजे ३२ टक्के मते मिळाली. न्यू पॉप्युलर फ्रंट ही डावी आघाडी २८ मते मिळवून दुसऱ्या क्रमांकावर राहिली. या डाव्या आघाडीमध्ये सोशालिस्ट, ग्रीन, कम्युनिस्ट आणि फ्रान्स अनबाऊड या पक्षांचा समावेश आहे. तर, विद्यमान अध्यक्ष मॅक्रॉन यांच्या मध्यममार्गी एनसेम्बलला सर्वात कमी म्हणजे २०.७ टक्के मिळाली आणि त्यांची तिसऱ्या क्रमांकावर घसरण झाली. पहिल्या फेरीतच ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाल्यामुळे ७६ जागांचे निकाल नक्की झाले होते. त्यामुळे ५७७ मधून ७६ जागा वजा झाल्या आणि दुसऱ्या फेरीत ५०१ जागांसाठीच फेरमतदान झाले. पहिल्या फेरीतील कल कायम राहिल्यास उजव्या मेरीन ली पेन यांचा 'आरएन' बहुमत मिळवेल, अशी शक्यता होती. म्हणून, मॅक्रॉन यांनी डाव्या पक्षांशी म्हणजे न्यू पॉप्युलर फ्रंटशी हातमिळवणी केली.

अंतिम निकालानुसार पहिला क्रमांक जीन-ल्यूक मॅलेंचॉन यांच्या डाव्या पक्षांच्या न्यू पॉप्युलर फ्रंटला मिळाला. या आघाडीला जवळपास २७ टक्के मतांसह सर्वाधिक १८२ जागा मिळाल्या. दुसऱ्या क्रमांकावर अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या नेतृत्वाखालील एनसेम्बल या मध्यममार्गी आघाडी असून त्यांनी सुमारे २२ टक्के मतांसह १६८ जागा मिळविल्या आहेत तर मरीन ली पेन यांच्या नेतृत्वाखालील अतिउजव्या नॅशनल रॅलीला (आरएन) तब्बल ३७.३ टक्के मतदारांनी पहिली पसंती दिली असूनही त्यांना १४३ जागांवरच समाधान मानावे लागले आहे. जी आघाडी पहिल्या फेरीत पहिल्या क्रमांकावर होती, ती दुसऱ्या फेरीनंतर तिसऱ्या क्रमांकावर फेकली गेली. बहुमतासाठी २८९ जागा आवश्यक आहेत. एवढ्या जागा कोणत्याही एका पक्षाला किंवा आघाडीला न मिळाल्यामुळे त्रिशंकू सभागृहाची स्थिती निर्माण झाली आहे. परंतु, दुसऱ्या फेरीत डाव्या आणि मध्यममार्गी पक्षांनी आपापसात समझोता करून निवडणूक लढवल्यामुळे आता ते एकत्रितपणे सरकार स्थापन करतील, अशी शक्यता आहे. पण नेतृत्व कोण करणार? दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या नेतृत्वाखालील 'एनसेम्बल' या मध्यममार्गी आघाडीचा नेता की पहिला क्रमांक मिळविणाऱ्या जीन-ल्यूक मॅलेंचॉन यांच्या डाव्या पक्षांच्या न्यू पॉप्युलर फ्रंटचा नेता? दुसऱ्या फेरीत अतिउजवे मागे पडावेत म्हणून मॅक्रॉन यांनी न्यू पॉप्युलर फ्रंटशी तडजोड केली असली, तरी आता मॅक्रॉन यांना या नॅशनल रॅली किंवा न्यू पॉप्युलर फ्रंट यापैकी कुणाशीही जवळीक नको आहे. पण कोणते तरी दोन पक्ष एकत्र आल्याशिवाय बहुमताचा आकडा गाठता येणार नाही. मतदारांनी त्रिशंकू (हंग) नॅशनल असेम्ब्लीला कौल दिला. कोणत्या तरी दोन पक्षांनी एकत्र यावे, असा कौल आहे. अतिउजव्यांचे सत्ता स्थापनेचे स्वप्न भंग पावले. आठवड्यापूर्वी मतदानाच्या पहिल्या फेरीत मिळालेल्या यशामुळे अतिउजव्यांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. त्या दुसऱ्या फेरीतील निकालामुळे पार धुळीस मिळाल्या. नॅशनल रॅलीला पहिल्या फेरीत नॅशनल असेम्ब्लीत १३५ जागा आणि ३२ टक्के मते मिळाली होती. तिला मिळालेल्या मतांची टक्केवारी सर्वात जास्त होती. त्यामुळे नॅशनल रॅलीच्या कार्यकर्त्यांत जल्लोषाचे वातावरण होते तर इतरांमध्ये घोर निराशा पसरली होती.

पहिल्या फेरीतील २२० उमेदवारांनी दुसऱ्या फेरीतून माघार घेतल्यानंतर नॅशनल रॅलीने २९ त्रिकोणी लढतीमधल्या १० जागी विजय संपादन केला. ज्या मतदार संघात फक्त दोनच उमेदवार होते तिथेही नॅशनल रॅलीने पूर्वीच्या बहुतेक जागा आपल्याकडेच राखण्यात यश मिळविले, यावरून नॅशनल रॅलीची फ्रेंच मतदारांवरील पकड किती पक्की आहे, ते जाणवल्याशिवाय राहणार नाही. पण अनेक फ्रेंच नागरिक नॅशनल रॅलीकडे ती एक वंशवादी, परकीय नागरिकांकडे संशयाने पाहणारी (झेनोफोबिक), ज्यू विरोधी (अँटिसेमॅटिक) संघटना आहे, या दृष्टीनेच पाहतात, हे स्पष्ट होते. फ्रान्स आणि अन्य अशा दोन्ही देशांची नागरिकता कायम ठेवणाऱ्या नागरिकांची (बायनॅशनल) निष्ठा नेमकी कुणाकडे आहे, याबाबतही नॅशनल रॅलीने निवडणूक प्रचारादरम्यान गंभीर चिंता व्यक्त केली होती. नॅशनल रॅलीला खऱ्या अर्थाने सर्व फ्रेंच नागरिकांचा पक्ष म्हणून स्वीकार्यता हवी असेल तर तिला आपल्या धोरणात बदल करावा लागेल. आपापल्या राष्ट्रांबाबतचा कडवा अभिमान, सध्या युरोपात मध्यपूर्वेतून किंवा आफ्रिकेतून होत असलेल्या लोकांच्या स्थलांतरणाला विरोध, आपण युरोपियन सगळे एक या भूमिकेचा ऱ्हास ही उजव्या विचारसरणीची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. नॅशनल रॅली याला अपवाद नाही. स्थलांतरितांबरोबर छुपे दहशतवादीही येतात. आश्रयदात्याच्या देशात उच्छाद मांडतात, हा अनुभव युरोपातील बहुतेक देशांना आलेला असल्यामुळे नॅशनल रॅलीची भूमिका वस्तुस्थितीच्या विरोधात नाही, हेही खरे आहे. फ्रान्समधील पक्ष आजतरी गटातटांत विखुरलेले आहेत. एक दुसऱ्याचे तोंडही पाहण्यास तयार नाही. नॅशनल रॅलीला वगळून निदान सात राजकीय पक्ष एकत्र आल्याशिवाय बहुमताचा आकडा गाठला जाणार नाही. मॅक्रॉन यांच्या मध्यममार्गी गटाचे नेतृत्व त्यांच्या पार्टी ऑफ रिनेइसन्सकडे (पुनर्जन्म) आहे. ते ना जीन-ल्यूक मॅलेंचॉन डाव्या फ्रान्स अनबोड पक्षासोबत यायला तयार नाहीत ना नॅशनल रॅली बरोबर! याउलट 'फ्रान्स अनबोड' हा डावा पक्ष फार्मात आहे. त्याचे म्हणणे असे आहे की, भलेही बहुमताइतक्या जागा नसतील, पण आमचेच सर्वात जास्त सदस्य आहेत. त्यामुळे नैतिक विजय आमचाच आहे. आमच्या न्यू पॉप्युलर फ्रंटला सोबत न घ्याल तर ते सरकार बेकायदेशीर ठरेल. आजवर बहुतेक काळात फ्रान्सने द्विपक्षीय राजवटच पाहिलेली आहे. प्रत्येक पक्षाची आपली आपली विचारधारा असायची. फ्रान्समध्ये डावे आणि उजवे असे ध्रुवीकरणच मुळात होते. यात गेल्या काही वर्षांत तीव्र स्वरूपाचे मतभेद होऊन वेगवेगळे गट निर्माण झाले आहेत. मॅक्रॉन यांनी या गटांना एका मध्यवर्ती ध्रुवाभोवती गोळा करण्याचा प्रयत्न केला. या निवडणुकीने मतभेद उघड झाले आणि पक्षांची बजबजपुरी समोर दिसू लागली. २०२२ मध्ये मॅक्रॉन यांचे पार्लमेंटमधील बहुमत गेले. यावर मॅक्रॉन यांनी उपाय काय केला तर पार्लमेंटला डावलून काम करण्याचा अधिकार मतदारांनी निवडून दिलेल्या अध्यक्षाला बहाल करणारी घटना दुरुस्ती पारित करून घेतली. या वळशामुळे अतिउजव्यांविरुद्ध अध्यक्षांसोबत राहून काम करण्याचे एवढीच भूमिका इतरांसाठी उरली. अतिउजव्यांविरुद्ध भूमिका घेणे एवढेच काम पाठराखे पक्ष आणि मतदार करीत. एवढेच त्यांचे काम असे. २०२२ मध्ये पार्लमेंटमधील मॅक्रॉन यांचे बहुमत गेले तरी पार्लमेंटच्या सहमतीची आवश्यकताच न उरल्यामुळे मतदारांनी बहुमताने निवडून दिलेला अध्यक्ष या नात्याने एकट्याच्याच भरवशावर मॅक्रॉन पुढे जात राहिले. आता संवाद, चर्चा, वादविवाद, वाटाघाटी आणि त्यातून पुढे सहमतीचे राजकारण या बाबी उदयाला येतील. त्याशिवाय निर्णय होऊ शकणार नाही. द्विपक्षीय स्थितीमध्ये ही सर्व औपचारिकता मात्र असते. या निवडणुकीच्या काळातच या प्रक्रियेला प्रारंभ झाला, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. अतिउजव्यांचा पराभव करण्यासाठी मॅक्रॉन यांच्या मध्यममार्गी पक्षाला काहीसे डावीकडे सरकावे लागले तर डाव्यांना अतिडाव्यांची साथ सोडून उजवी कड घ्यावी लागेल. असे केले तरच आघाड्या टिकतात. हा एक मोठाच धडा या निवडणुकीने दिला, असे म्हणावे लागते.

९४२२८०४४३०

## वेध

नितीन शिरसाट

# वीजबचतीसाठी सौरशक्तीचा वापर

आपल्या देशात औद्योगिक क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत असून, विजेच्या मागणीतही प्रचंड वाढ होत आहे. वीजनिर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या कोळशाचा साठा अपुरा पडतो आहे. त्यामुळे पारंपरिक वीजनिर्मिती साधने अपुरी पडत आहेत. देशाला पुढच्या येणाऱ्या काळात विजेच्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून केंद्र सरकार ऊर्जा मंत्रालयाने रूफटॉप सोलर योजना महाराष्ट्रात राबविण्याचा विचार केला. या योजनेंतर्गत घरगुती, गृहनिर्माण संस्था व निवासी कल्याणकारी संघटना यांच्या छतावर रूफटॉप सोलर ऊर्जानिर्मिती यंत्रणा बसविण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाकडून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार असून, घरगुती वीज बिलात बचत होण्यास मदत होईल, तर सौर ऊर्जेमुळे जास्तीची ऊर्जा नेट मीटरिंगद्वारे महावितरणाला विकता येणार आहे. त्यामुळे ग्राहकाला थोडी फार आर्थिक मदत मिळण्यास मदत होईल. घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना किमान १ किलोवॅट क्षमतेची छतावर सौर ऊर्जानिर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून वित्त साहाय्य अनुदान देण्यात येणार आहे. योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील नागरिकांना त्यांच्या घराच्या, कारखान्याच्या, कचेरीच्या छतावर सोलर पॅनल बसविण्यासाठी ४० टक्के अनुदान देणे; जेणेकरून वीज मंडळावरील वाढत चालणारा विजेचा भार कमी होईल. वीज ग्राहकांसाठी सोलर सिस्टिम मोफत विजेचा लाभ मिळणार असून, मोठ्या वीज बिलांपासून दिलासा मिळणार आहे. यासाठी अर्ज करून तुम्ही तुमच्या घराच्या छतावर सोलर प्लांट बसवू शकता. या योजनेमुळे राज्यातील गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांनाही अनुदानाचा लाभ घेता येईल आणि त्यांच्या घराच्या छतावर सोलर पॅनल बसवून मोफत विजेचा लाभ घेता येईल. हा बदल ओळखून राज्य सरकारने 'मुख्यमंत्री सौर योजना' सुरू केली आहे; जो विविध क्षेत्रांमध्ये सौर ऊर्जेच्या गती देण्याच्या उद्देशाने एक बहुआयामी उपक्रम आहे.



महाराष्ट्र मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना २०२३ हा राज्यातील शेतकऱ्यांना शेत सिंचनासाठी मदत करणारा नवीनतम उपक्रम आहे. महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमाचे प्राथमिक उद्दिष्ट राज्यातील शेतकऱ्यांना सौर कृषी पंप पुरवणे हे आहे; जेणेकरून ते त्यांच्या पिकांना सिंचन करू शकतील. महाराष्ट्र सरकार मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना अंतर्गत शेतकऱ्यांना सौर कृषी पंपांसाठी ९५ टक्के अनुदान देण्यास वचनबद्ध आहे. याशिवाय कालबाह्य डिझेल पंपांना सौर पंपांनी बदलण्याचे काम सरकार हाती घेणार आहे. केवळ पावसावर आधारित शेती व सिंचित शेती यात तुलना केल्यास, सिंचित शेती ही सरासरी प्रतियुनिट जमिनीच्या दुप्पट उत्पादक ठरते. त्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता वाढून पिकांत वैविध्यता येते. महाराष्ट्रात कृषी क्षेत्रापैकी एकूण सिंचन क्षेत्र ४४.१९ लाख हेक्टर असून, ८० टक्के क्षेत्र पावसावर अवलंबून आहे. ७० टक्के शेतकरी अत्यल्प व अल्पभूधारक या वर्गात मोडतात. शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची गरज भागविण्याकरिता सद्य:स्थितीत बरेच शेतकरी विजेद्वारा चालणारे पाण्याचे पंप आणि डिझेल पंपांचा वापरतात. पण महाराष्ट्रातील बहुतांश शेती ही दुर्गम मागास भागात आहे. अशा ठिकाणी तसेच अन्य ठिकाणी विजेद्वारा चालणारे पाण्याच्या पंपाचा वापर करणे हे इतके सोपे नाही. त्याला कारण म्हणजे वारंवार होणारी वीज कपात, वीजटंचाई व भारनियमनाची समस्या! त्यामुळे शेतकरी हवालदिल होतो. मोठ्या संख्येने शेतकरी अजूनही डिझेल आणि इलेक्ट्रिक पंप वापरून त्यांच्या शेतात सिंचन करतात, इंधन पंपांच्या उच्च किमतीमुळे मोठा खर्च येतो. या समस्येवर तोडगा म्हणून ही योजना आहे. ज्या ठिकाणी सौरपंप सुविधा शक्य नाही अशा ठिकाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे हे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचे उद्दिष्ट आहे. सौर कृषिपंपासाठी मागणी नोंदविल्यानंतर मंजुरीसाठी वर्षभर प्रतीक्षा करावी लागते. सौर कृषिपंप कंपन्या शेतकऱ्यांशी संपर्क साधून आमच्याच कंपनीच्या पंपाची निवड करण्याचा आग्रह धरतात. अनेक पात्र शेतकऱ्यांची निवड झाल्यानंतरही महाऊर्जा किंवा महावितरणकडून लाभार्थींना वेळेवर संदेश प्राप्त होत नाहीत. उपलब्ध कोटा असलेल्या कंपन्यांपैकी एका कंपनीचीच निवड करावी. शेतकऱ्यांना घरगुती वापरासाठी वीजनिर्मितीची कुठलीही सुविधा उपलब्ध होत नाही. ऊर्जेचा वाढता खर्च आणि पर्यावरणाच्या वाढत्या चिंतेमध्ये सौरशक्तीचा वापर करणे ही महाराष्ट्रातील अनेकांसाठी एक आकर्षक निवड बनली आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# खेळातून रोजगाराचा मेळ!

संपूर्ण देशाचेच नव्हे, तर अवघ्या जगाचे लक्ष ऑलिम्पिकमधील क्रीडापटूंच्या कामगिरीकडे लागले होते. क्रीडा क्षेत्राची व्याप्ती केवळ विविध खेळांच्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांपुरतीच मर्यादित नाही, तर यामागेही मोठे अर्थकारण सामावलेले आहे. त्यातून क्रीडा साहित्य निर्मिती व विक्री, खेळांच्या मोठ्या व्यावसायिक स्पर्धाही आयोजित केल्या जातात. अशा कार्यक्रमांचे आयोजकच नव्हे, तर क्रीडा व्यवस्थापनापासून प्रत्यक्ष खेळाडूंपर्यंत अनेकांना विविध प्रकारचे रोजगार वा व्यावसायिक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. यासंदर्भात भारतातील आयपीएल क्रिकेट स्पर्धांचे उदाहरण प्रामुख्याने देता येईल. भारतीय आयपीएल व त्याची लोकप्रियता, रंजकता व विविधता याआधारे अक्षरशः लाखो जणांना व्यवसाय संधी उपलब्ध झाल्या आहेत. या संधी प्रामुख्याने जाहिराती प्रचार-प्रसार, तिकीट विक्री, आहार व्यवस्था, वाहतूक व पर्यटन व्यवसाय, क्रीडा व्यवस्थापन, मार्गदर्शन इ. विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असून, त्याचा फायदा मोठ्या संख्येत होत आहे. याचा अधिकांश लाभ युवावर्गाला होत आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय.

सद्य:स्थितीत भारतात प्रामुख्याने १० मुख्य स्वरूपाच्या आयपीएल क्रीडा स्पर्धा होत आहेत. यामध्ये मुख्यतः क्रिकेट, फुटबॉल, खो-खो, कबड्डी या लोकप्रिय खेळांचा समावेश आहे. या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनांच्या जोडीलाच आता तर आंध्र प्रीमियर लीगपासून झी-महाराष्ट्र कुस्ती स्पर्धापर्यंतच्या राज्य वा प्रादेशिक स्तरावर आयोजित केल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांमुळे, त्यांना मोठ्या रकमांसह प्रायोजक मिळू लागले आहेत. त्यातून मोठी आर्थिक उलाढाल कायमस्वरूपी होत आहे. त्यातून निर्माण झालेल्या मोठ्या लाभाकडे पाहता, या स्पर्धा आयोजनात आता कॉर्पोरेट कंपन्या प्रामुख्याने उतरल्या आहेत. त्यामुळे खेळांपुरत्या मर्यादित असणाऱ्या स्पर्धांमुळे आर्थिक व्यवहार, व्यवसाय व फायद्यांवर अधिक जोर दिला जात आहे.

जाणकारांच्या मते, भारताचे भौगोलिक क्षेत्र, लोकसंख्या त्यातील युवकांचे प्रमाण व सद्य:स्थिती पाहता, भारतात मोठ्या प्रमाणात खेळ आणि क्रीडा आयोजनासाठी भरपूर वाव आहे. भारताच्या विभिन्न प्रांतांचे स्वतःचे असे क्रीडा प्रकाराचे वैशिष्ट्य असून, त्याचा फायदा क्रीडा आयोजनामुळे होणार आहे. यासंदर्भात केरळमधील सहा खेळाडूंसह खेळल्या जाणाऱ्या सेव्हन्स फुटबॉलपासून काश्मीरमधील लाकडी काठी व लाकडी चेंडूंसह खेळला जाणारा खोदार खानपासून नागालॅण्डच्या बांबूफेक खेळापर्यंतचे उदाहरण वानगीदाखल दिले जात आहे. सरकारी स्तरावर जारी करण्यात आलेल्या क्रीडाविषयक धोरणानुसार देशांतर्गत क्रीडा कौशल्य व विविध खेळांमध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्यांना प्रशिक्षणापासून मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यापर्यंत भर देण्यात आला आहे. यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात ४५ लाख कोटींची तरतूद करण्यात आली होती. यापैकी ५०० कोटींची तरतूद क्रीडा प्रशिक्षक व प्रशिक्षणासाठी केली होती. सरकारच्या याच धोरणानुसार निश्चित व कालबद्ध स्वरूपात क्रीडा प्रशिक्षणातून क्रीडा कौशल्यांसह अधिकाधिक संख्येत युवकांना अव्वल बनविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यातून भारतीय युवकांना ऑलिम्पिक व इतर जागतिक स्तरावरील विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धांमध्ये आवर्जून सामावून घेतले जाते.

सरकारतर्फे क्रीडापटूंना शिष्यवृत्ती, मार्गदर्शन, अर्थसाहाय्य इ. केले जाते. याशिवाय शासनाच्या विविध योजना राबविल्या जातात. मात्र, सरकारने राज्य वा केंद्र स्तरावर आपापल्या वार्षिक अर्थसंकल्पात तरतूद केल्यास खेळ आणि क्रीडापटूंना कायमस्वरूपी प्रोत्साहन मिळू शकेल. यातूनच काही प्रयत्न-पुढाकार विविध राज्यस्तरांवर घेतले जाऊ शकतात. महाराष्ट्र वा हरयाणा यासारख्या राज्यांनी कुस्तीला प्रोत्साहन देणे फायदेशीर ठरू शकते वा वन आणि वनवासीबहुल राज्यांनी नेमबाजी वा मल्लखांब यासारख्या खेळाडू आणि क्रीडा प्रकारांना योजनापूर्वक प्रतिसाद आणि प्रोत्साहन दिल्यास, त्याचे फायदे राज्यापुरतेच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर होऊ शकतात.

खेळ आणि क्रीडा प्रकारांचा वाढता व्याप आणि प्रसार यामुळे विविध प्रकारच्या खेळासाठी आवश्यक क्रीडा साधने आणि सामग्रीचे उत्पादन व विक्री हे नोकरी-व्यवसायाचे एक नवे दालन विकसित स्वरूपात उपलब्ध झाले आहे. विविध क्रीडा वस्तू व संबंधित सामान यांचे उत्पादन व विक्री आता अनिवार्य ठरली आहे. त्यातही या क्षेत्राचे वैशिष्ट्य म्हणजे, एकीकडे वाढत्या क्रीडा प्रसाराबरोबरच त्यांना लागणाऱ्या अधिकांश वस्तू एकवेळ वापरणे वा वारंवार बदलणे अशा प्रकारच्या असतात. क्रिकेटच्या बॉल-बॅटपासून बॅडमिंटन, फुटबॉल व थेट कुस्तीच्या गादीपर्यंतच्या वस्तूंचा यात समावेश करता येऊ शकतो.

खेळ आणि क्रीडा प्रकारांसाठी कायमस्वरूपी आवश्यक अशा वस्तू आणि उपकरणे-उत्पादने यांच्या उत्पादन-संशोधन, विक्री व्यवस्थापन व व्यवसाय यासंदर्भात भारताने आपली छाप जागतिक स्तरावर प्रस्थापित केली आहे. याशिवाय खेळ, मनोरंजन यासारख्या युवकांच्याच नव्हे, तर जनसामान्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या व प्राधान्याच्या क्षेत्रांत सहभागी होणारे, विविध क्रीडा प्रकार आणि आयोजनांमध्ये रुची घेणारे व प्रसंगी त्यासाठी खर्च करणारे या साऱ्यांमध्ये होणारी वाढ क्रीडा क्षेत्रासाठी सर्वोपरी पूरक ठरली आहे. भारतीय क्रीडा उद्योगाच्या संदर्भात नव्यानेच प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार, २०२३ या आर्थिक वर्षाअखेर भारतातील क्रीडा क्षेत्र आणि क्रीडासंबंधी उद्योगाची एकत्रित उलाढाल ५.१ अब्ज डॉलर्स होती. याच अंदाजानुसार, २०३२ सालापर्यंत भारतातील क्रीडा उद्योगांची अधिक वाढ होऊन त्याची एकत्रित उलाढाल १० अब्ज डॉलर्स होणे सहज शक्य आहे. या ढोबळ आकडेवारीवरून भारतातील क्रीडा क्षेत्राची वाढ व त्यातून होणाऱ्या वाढत्या आर्थिक उलाढालीची प्रामुख्याने कल्पना येते. या आर्थिक उलाढालीतून वाढता व्यवसाय व क्रीडाविषयक विविध संधी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरूपात निश्चितपणे उपलब्ध होणार आहेत. परंपरागतरीत्या सांगायचे झाल्यास, भारतातील क्रीडा आणि त्यासंबंधी साहित्य निर्मिती उद्योगाची सुरुवात भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानातून आलेल्या व पंजाबमध्ये जालंधर व उत्तरप्रदेशातील मेरठमध्ये स्थायिक झालेल्या कुटुंबांनी केली. आपली मेहनत व कौशल्यांच्या आधारे देश-विदेशात नाव व लौकिक कमावला. आज ६५ वर्षांनंतरसुद्धा या कारागीर व लघु उद्योजकांना कोणतीही औपचारिक साथ वा साहाय्य न मिळता त्यांनी परिश्रमपूर्वक व खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर स्वरूपात आपले काम सुरूच ठेवले आहे. गेल्या वर्षीपासून मेरठ व जालंधर या दोन्ही ठिकाणी क्रीडा साहित्य निर्मिती व उत्पादन उद्योगातून २,१०० कोटी रुपयांच्या क्रीडा सामग्रीची निर्यात करून जगात आपले नाव आणि कर्तृत्व प्रस्थापित केले आहे. आता तर क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण व सार्वत्रिक विचार करून त्याला अधिक व्यापक व व्यावसायिकदृष्ट्या देश-विदेश पातळीवर यशस्वी करण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट यासारख्या प्रतिष्ठित संस्थांनी या कामी पुढकार घेतला असून, त्यामुळे भारतातील क्रीडा करीअर क्षेत्राला व्यापक दिशा लाभली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### बांगलादेशातील सत्तांतर व भारत

अलिकडेच एक सत्तांतर आपल्या शेजारी असलेल्या बांगलादेशमध्ये झाल्याचे जगाने पाहिले. मात्र ते होताना पाकिस्तानमधील आयएसआय, अमेरिका व चीन या देशांच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून ही मोहीम सुरू करण्यात आली होती, असे ऐकू येत आहे. संपूर्ण जगावर अधिराज्य गाजवू या हेतूने मुस्लिम मानसिकता तयार होते आहे. मात्र, आपल्या देशातील काँग्रेसची ध्येयधोरणे केवळ आणि केवळ व्होट बँकेचे राजकारण करीत आहेत. आज बांगलादेशातील हिंदू माणूस मारला जात आहे. मंदिरे तोडली, जाळली जात आहेत. या घटनेचा विचार समस्त हिंदू लोकांनी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. जवळपास दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी एका भाषणात असे म्हटले होते की, आता हे आरक्षण आर्थिक आधारावर दिले पाहिजे. जाती-आधारित आरक्षण रद्द झाले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा या विषयावर आताच एक निर्णय घेतला आहे. कारण, या विषयावर आपले देशातील विरोधी पक्ष हा केवळ मोदींना विरोध म्हणून राजकारण करीत आहे. मात्र, देशाचा विचार करून राजकीय भूमिका घेतली पाहिजे, असे होत नाही. त्यामुळे हे आरक्षण आर्थिक आधारावर दिले पाहिजे. तरच ते योग्य राहील. समाजा-समाजात तेढ निर्माण होणार नाही, असे मला वाटते. मात्र, बांगलादेश येथील ही घटना वाटते एवढी सोपी नाही, हे मात्र खरे. सर्व हिंदू समाजाला यापुढे तरी एकत्रित येण्याची गरज निर्माण झाली आहे, असे वाटते.

**विष्णू सोळंके**/७०२०३००८२४

### शिस्त खाण्याची!

प्रत्येक कार्य करण्याची एक शिस्त असते; त्याप्रमाणे खाण्याचीही शिस्त असते. खाण्याची शिस्त अलिकडील राहिलेली नाही. त्यामुळे दवाखाना आणि त्यांची संख्या वाढते आहे. सर्वसामान्यपणे आपण जेवण करताना विविध प्रकारांचे पदार्थ खातो. अलीकडे एक नवीनच प्रकार खाण्याचा सुरू आहे. अगदी सहजपणे, तो म्हणजे पैसे खाण्याचा! इतर पदार्थ खात असताना त्याचे काही नियम असतात. त्यामुळे त्यात शिस्त निर्माण होते. परंतु पैसे खात असताना नियम तोडावे लागतात. पैसे खाऊन प्रकृती खराब झाली की शासकीय ससेमिरा मागे लागतो. त्यांना बाहेर काढण्यासाठी त्याचा जयजयकार करीत मोर्चा काढतात. अतिपदार्थ खाणे झाले म्हणून उपचार करून डॉक्टर घरी पाठवतात तर अतिपैसे खाणे झाले तर लॉकअपमध्ये पाठवतात. पैसे खात असलेल्या व्यक्तींना आपण सन्मान देतो. त्यांना सलाम करत निवडून देतो. त्यासाठी आता शिस्त पाळावी लागेल. कारण असे लोक आपला देश विकून पैसे खातील.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

### दिरंगाईचे लाभधारक!

आमदार अपात्रतेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेप्रकरणी 'दिरंगाई' होत असल्याचे मत व्यक्त करून उबाठा सेनेचे विश्वप्रवक्ते संजय राऊत यांनी नाराजी व्यक्त केली आहे आणि त्याबाबत सर्वोच्च न्यायालयास मुखपत्रातून 'रोखठोक खडेबोल' सुनावले. त्यात न्यायालयाची बेअदबी होत नाही का, ते सर्वोच्च न्यायालय ठरवेलच. मात्र राऊत हे अशाच 'दिरंगाई'चे लाभधारक नाहीत का? कारण पत्राचाळ प्रकरण, स्वप्ना पाटकर प्रकरण यांवर जर तातडीने सलग सुनावणी झाली असती तर आज राऊत कोठे असते?

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

### चटका लावणारी एक्झिट!

आपल्या सहज सुंदर अभिनयाच्या विविध कंगोऱ्यातून चित्रपट, नाटक, मालिका आदी माध्यमांद्वारे रसिक मनावर अधिराज्यच नव्हे तर प्रेक्षकांच्या हृदयात स्थान निर्माण करणारा आपला माणूस म्हणून आपलेसे वाटणारे विजय कदम यांचं जाणं चटका लावणारं, वेदनादायी. मराठी कलाविश्वाचं नुकसान करणारं. टूर टूर, सही रे सही, इरसाल कार्टी, गंमत जंमत, पप्पा सांगा कुणाचे, तेरे मेरे सपने, दे दणादण, हळद रुसली... नाव तरी किती सांगायची; मात्र अशा अनेक विविधांगी कलाकृतीतून त्यांनी केलेल्या दमदार भूमिका



जशाच्या तशाच नजरेसमोर येतात आणि हृदयात रुतून जातात अभिनेत्यासह. विजय कदम यांच्या अभिनयातून सजलेली, साकारलेली एक एक कलाकृती म्हणजे कलाविश्वातील टपोरा मोतीच, याचा विसर रसिक मनाला कधीही पडणार नाही. वैशिष्ट्यपूर्ण संवादफेक, मुद्राभिनय, अचूक टायमिंग, भूमिकेतील लहानसहान कानाकोपरे शोधत ते लक्षवेधी करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. विनोदी भूमिकांसह गंभीर भूमिकांनाही ते यशोशिखरावर घेऊन जात. व्यक्तिरेखेचा स्वभाव स्वतःमध्ये भिनवायची जबरदस्त शक्ती असणारा हा कलाकार. त्यांच्या खुमखुमीचा विसर तर रसिक मनाला कधीच विसरता येणार नाही. माणूस आणि माणुसकी जपणाऱ्या आपल्या माणसास अभिनेते विजय कदम यांना भावपूर्ण आदरांजली.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

## संक्षिप्त वृत्त...

### १६ ऑगस्ट रोजी स्वामुक्टा प्राध्यापक संघटनेचा मोर्चा

**परभणी,/प्रतिनिधी:** उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून भारतीय संविधानातील तरतुदींमध्ये घरगुती पद्धतीने बदल करून सुरु असलेल्या मनमानी कारभाराच्या विरोधात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने (एमफुक्टो) विविध कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत एमफुक्टो संलग्नित 'स्वामुक्टा' संघटनेचा जाहीर पाठींबा असून या आंदोलन कृतीचा भाग म्हणून 'स्वामुक्टाफ संघटनेच्या वतीने दि. १६ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता स्वा.रा.ती.म.विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वार ते प्रशासकीय इमारत असा मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चाला संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड, सचिव डॉ. विजय भोपाळे, कोषाध्यक्ष डॉ. दिलीप पाईकराव, उपाध्यक्ष डॉ. डी. एन. मोरे, डॉ. करूणा देशमुख, डॉ. विष्णू पवार, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. लक्ष्मण शिंदे हे मार्गदशन करणार आहेत. या मोर्चानंतर कुलगुरूंना आपल्या विविध म ागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. त्याामध्ये, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसुचनेची जशास तशी अंमलबजावणी करावी, एम.फिल व पीएच.डी करिता प्रोत्साहनपर वेतनवाढ सुरू ठेवावी, सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीचे लाभ हे पात्रता दिनांकापासून देणे, एम.फिल. धारक प्राध्यापकांना पदोन्नतीचे लाभ तात्काळ प्रदान करावेत, १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, पूर्णवेळ प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी, नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या तारखेपासून सेवा ग्राह्य धरून जुनी पेन्शन योजनेचे लाभ देण्यात यावे, प्राध्यापकांना अनुज्ञेय असलेल्या सर्व प्रकारच्या रजा लागु करण्यात याव्यात, विद्यापीठ कायदा २०१६ यास अनुसरून एकरुप परिनियम लागु करावे आदी मागण्यांचा सम ावेश आहे. दरम्यान, परभणी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील पूर्णवेळ व तासिका तत्वावर कार्यरत सर्व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे , असे आवाहन परभणी जिल्हा अध्यक्ष डॉ. किशोर हुगे, सचिव डॉ.नानासाहेब पाटील, कोषाध्यक्ष डॉ.मोतीराम कदम, उपाध्यक्ष डॉ.तुकाराम फिसफीसे, डॉ. गंगाधर कापुरे, डॉ.राजेश देशमुख, डॉ. विजय भोपाळे, डॉ. सुभाष यादव, डॉ. पुष्पा गंगासागरे, डॉ. सुनिता कुकडे, डॉ. बी. एस. गिते यांनी केले आहे.

### विविध मागण्यासाठी शिक्षक सेनेव्दारे भजन आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी:** राज्यातील शिक्षक, कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, टप्पा अनुदान तात्काळ देण्यात यावे या प्रमुख मागणीसह शिक्षकांच्या मुलभूत २३ मागण्यासाठी शिक्षक सेनेच्या वतीने मंगळवार १३ ऑगस्ट रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षक सेनेच्या वतीने भजन आंदोलन करण्यात आले.

मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष बाळासाहेब राखे यांच्या नेतृत्वाखाली हे भजन आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात खाजगी विभाग जिल्हाध्यक्ष प्राचार्य दिगंबर मोरे, जिल्हाध्यक्ष गुलाब हरकळ, जि.प. विभाग जिल्हाध्यक्ष सायस चिलगर, जिल्हा कार्याध्यक्ष नरेंद्र दिशागत, गोपाळ मोरे, महानगराध्यक्ष प्रकाश हरगावकर, पंडित दराडे, सारंगधर पवार, जयशंकर राखुंडे, लक्ष्मण मदरप्पल्ले, शिवप्रसाद ठाकूर, गोविंद कदम, दिलीप पोळ, संजय जाधव, सिताराम नाईक, संतोष वाघमारे, बालाजी सातपुते, गुरुनाथ सुलगुडले, हरिश्चंद्र कर्डिले, तुळशीदास मोरतळे, विशाल राठोड, बालाजी कांदे, राम सुळे, कदम सर, मनोहर गाडे, सूर्यकांत देवरे, नागनाथ तुडमे, सिद्धेश्वर मुंडे, शेख सगिर, गिरीश पिंपळगावकर, शिवाजी कांबळे, विजय पैठणी, मारुती पवार, अजय शिंदे, सूर्यकांत शेळके, लक्ष्मण वाघमारे, अभिजीत धानोरकर, बालासाहेब कोरडे, भारत कदम, सौ. अर्चना चव्हाण, सौ. सुनंदा पांचाळ यांच्यासह शेकडो शिक्षक सहभागी झाले होते. दरम्यान, यावेळी परभणी जिल्हा मुख्याध्यापक संघाने जाहीर पाठिंबा देऊन आंदोलनात सहभाग नोंदवला. यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भांगे, जिल्हा सचिव देवानंद आंबोरे, कोषाध्यक्ष आर. एम. चव्हाण, सदाशिव मुंडे आदींची उपस्थिती होती.

### परभणीत कडाक्याचे ऊन

**परभणी,/प्रतिनिधी:** शहरात गेल्या दोन ते तीन दिवसापासून कडाक्याचे ऊन पडले असून त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास होत आहे. त्यातच या उन्हाचे चटके नागरिकांना असहाय्य होत आहेत. शिवाय पावसाने गेल्या काही दिवसापासून राज्यात उघडदीप दिली आहे. त्यामुळे सर्वत्रच उन्हाची लाट आल्यासारखे जाणवत आहे. परंतू याचा परिणाम नागरिक तसेच शेतकऱ्यांच्या शेती पिकांवर मोठया प्रमाणात होत आहे.

**जाहेर प्रगटन**

परभणी येथील मा. श्रीमती ए.बी. कुरणे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांचे न्यायालयात.
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४९४/२०२४ नि.क्र.०७
Petitioners: 1)Sunil S/o. Bhagvanrao Jamdade, Age-46 Years, Occu-Labour,R/o. Jafrabad Road, Tembhurni, Tq. & Dist. Jalna 2) Nandabai W/o, Anna Ghane, Age-55, Occu-Housewife. R/o. Phule Nagar, Majalgaon, Tq. Majalgaon, Dist. Beed.3) Aruna W/o. Somnth Kajale, Age: 43 years, Occ.: Housewife, R/o. Bhui Galli, Ravivar Peth, Beed, Tiq, and Dist. Beed.4) Savita W/o. Subhash Alane, Age: 36 years, Oce, Housewife, R/o. Indira Nagar, Kalamb, Tq. Kalamh, Tq, and Dist. Usmanabad., 5) Satish S/o. Bhagwanrao Jamdade, Age: 36 years, Oce:: Labour. R/o. Kandoba Bazar Road, Marathwada Plot, Parbhani, Tq. and Dist. Parbhani.
V/S.
Respondent: Nil
प्रकरण:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ आणि कलम ३०४ सिव्हील मॅन्युअल अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...
ज्या अर्थी, अर्जदार यांनी या न्यायालयात वकील श्री. एस. एल. संगेकर यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, भगवान पि. रामचंद जमदाडे हे दिनांक १२/११/२०१५ रोजी मराठवाडा प्लॉट, परभणी येथे आणि सरस्वती भ्र. भगवानराव जमदाडे ह्या दिनांक ११/१०/२०२२ रोजी खंडोबा बाजार रोड, मराठवाडा प्लॉट, परभणी येथे मयत झाल्या असून अर्जदार हे मयताचे वारस आहेत. उपरोनेखीत अर्जदार यांनी खालील बाबीसाठी अर्ज केला आहे.
For issue Legal heirship certificate to petitioner as legal heirs of deceased 1. Bhagwan S/o. Ramchandra Jmdade, 2. Saraswati W/o. Bhagvanrao Jamdade for the purpose of legal recognition and for fulfilling legal formalities of local government and semi government offices.
ज्याअर्थी, कोणास सदर अर्जाबाबत आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत आपला आक्षेप या न्यायालयात दाखल करावा नसता अर्जदाराचे म्हणणे ऐकून एकतर्फा निर्णय दिला जाईल,
आज दिनांक ०९/०८/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व शिक्यानिशी दिले.
पुढील दिनांक : ०३/०९/२०२४
आदेशान्वये,

स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व स्तर परभणी.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# तुमच्या आशीर्वादामुळेच अग्निदिव्यातून सुटलो!

## आ.डॉ.रत्नाकर गुट्टे भावूक : अभिष्टचिंतन सोहळा संपन्न, वचनपूर्ती प्रकाशन

**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** आजपर्यंतच्या वाटचालीत अनेक संकटे आली. विरोधकांनी माझी नाहक बदनामी केली. तरीही माझ्या माय-बाप जनतेने म्हणजे तुम्ही कायम साथ दिलीत. तुमचा माझ्यावर विश्वास आणि पाठींबा होता आणि आजही आहे, याची जाण मला आहे. त्यामुळे संकटांच्या सर्व अग्निदिव्यातून फक्त आणि फक्त तुमच्या आशीर्वादामुळेच सुटलो, अशी भावनिक कृतज्ञता गंगाखेडचे रासप आमदार डॉ.रताकर गुट्टे यांनी व्यक्त केली.



शहरातील कापसे गार्डन मंगल कार्यालय येथे आयोजित त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यातील सत्कार प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी औचित्या साधून आ.डॉ.गुट्टे यांच्या पाच वर्षीय कामगिरीचा आढावा घेणाऱ्या वचनपूर्ती या पुस्तिकेचे प्रकाशन हभप.चिन्मय महाराज सातारकर यांच्या शुभहस्ते व उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना.देवेंद्र फडणवीस आणि माजी मंत्री महादेव जानकर यांच्या ऑनलाइन प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. वचनपूर्ती या पुस्तिकेत आ.डॉ.गुट्टे यांच्या सर्व विकास कामांची निधीनिहाय नोंद घेण्यात आली असून विविध योजनांद्वारे केलेल्या कामांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

तत्पूर्वी, वाढदिवसाचे औचित्या साधून आ.डॉ.गुट्टे यांनी शहरातील श्री बालाजी मंदिर येथे मनोभावे अभिषेक व पूजा केली. तसेच संत जनाई ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विचार यात्रेचे उद्घाटन केले. पुढे आरोग्य केंद्रातील रूग्णांना फळे तसेच मित्र मंडळ व शासकीय योजना मदत केंद्राच्या वतीने बांधकाम कामगारांना साहित्या कीट, जेष्ठ नागरिकांना चष्मा, कमरेचा पट्टा व काठी वाटप करण्यात आले.

पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, येणारा प्रत्येक माणूस हा माझे संकट दूर होईल, या आशेने येतो. त्यामुळे तुमची कसलीही अडचण असू द्या, माझा दरवाजा सदैव उघडा असतो. त्यामुळे काहीही संकट आल्यास रात्री-अपरात्रीसुद्धा ठोठावा, तुमचा हा भाऊ, मुलगा, नातू सेवेसाठी सदैव तत्पर असेल.

आमदार डॉ.गुट्टे म्हणजे प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण आहेत. आम्ही विरोधात होतो, तेव्हापासून ते आमच्या सोबत आहेत. त्यांनी कधीही कसल्याही पदाची किंवा कुठल्याही गोष्टीची मागणी केली नाही. त्यामुळे त्यांच्या वेगळेपणाची मला चांगलीच ओळख आहे. परंतु, भविष्यात त्यांचा योग्य तो मान-सन्मान महायुती राखेल. त्यांचे वचनपूर्ती हे केवळ पुस्तक नाही, तर गंगाखेड विधानसभेच्या विकासाची गाथा आहे. त्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या सगळ्या गोष्टी या भागाचा कायापालट करण्यास कारणीभूत ठरले आहेत. त्याचा मला सार्थ अभिमान वाटतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ.डॉ.गुट्टेंचे कौतुक केले.

तर आमदार गुट्टे हे रासपचे लढणारे शिपाई आहेत. अनेक संकटांना भेदून ते इथपर्यंत पोहोचले आहेत त्यांच्यामुळे रासप मराठवाड्यात मजबूत झाला आहे. त्यामुळे आगामी काळात विधानसभेचा हा बालेकिल्ला ते राखतील आणि पुन्हा एकदा आपल्या सगळ्यांची मनोभावे सेवा करतील असं मला विश्वास असल्याचे, माजी मंत्री महादेव जानकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदुदेव जोशी यांनी केले. तर आभार वक्ते संदीप माटेगावकर यांनी मानले. यावेळी म हायुती व मित्र मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला, पुरुष, जेष्ठ मंडळी, युवक, युवती आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हभप.सातारकर यांच्या रसाळ कीर्तनाचेही भव्य आयोजन!

अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त राष्ट्रीय समाज पक्ष व मित्र मंडळाने प्रसिद्ध हभप.चिन्मय महाराज सातारकर यांचे कीर्तन आयोजित केले होते. त्या कीर्तनाच्या माध्यमातून महाराजांनी जनप्रबोधन करताना हलक्या-फुलक्या भाषेत अनेक दृष्टांत देवून दिले. तसेच त्यांनी दिलेली उदाहरणे समर्पक व आशयपूर्ण होती. त्यामुळे ऐकणारे अगदी मंत्रमुग्ध झाले होते.

तर उपक्रमांमुळे समाधान वाटते!

सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून आयोजित केलेल्या या कार्यक्रमांमुळे विविध घटकांना मदत झाली, याचे सम ाधान वाटते. राजकीय चौकट बाजूला ठेवून समाजहिताच्या भूमिकेला प्राधान्य द्या, असा माझा कायम आग्रह असतो. पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून तो जपला जातो, हि माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे, असे आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून सांगितले.



**जिंतूर- मा.जिल्हा परिषद अध्यक्ष परभणी तथा राष्ट्रवादी काँग्रेस जिंतूर- सेलू विधानसभा अध्यक्ष प्रसाद बुधवंत यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश झाला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव सुरेश नागरे, जिल्हाकार्याध्यक्ष नानासाहेब राऊत, विशालराव बुधवंत, शहराध्यक्ष बासू खान, सुधाकर नागरे आदी दिसत आहेत.**

## पटोले यांच्या उपस्थितीत अनेकांचा काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नगरपरिषदेचे माजी नगरसेवक उस्मान पठाण यांचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस चे प्रभारी रमेश चेनीथला, विरोधी पक्षनेते विजय वाडेट्टीवार यांच्या उपस्थितीत नांदेड येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाम ध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला होता.



आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव, सुरेश नागरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मागील काही दिवसापासून अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश घेताना दिसत आहेत. त्याचाच भाग म्हून जिंतूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक उस्मान पठाण यांनी नांदेड येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष मा.श्री.नानाभाऊ पटोले साहेब, महाराष्ट्र प्रभारी मा.श्री.रमेश चेन्निथलाजी, विरोधी पक्षनेते मा.श्री.विजय वडेट्टीवार साहेब, विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते मा.श्री.बाळासाहेब थोरात साहेब, कार्यकारी अध्यक्ष मा.श्री.नसीम खान साहेब, मा.खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण साहेब, महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य मा.सतेज पाटील साहेब, आमदार प्रज्ञाताई सातव, परभणी जिल्हाध्यक्ष आमदार सुरेश वरपुडकर साहेब यांच्या उपस्थित होते.

## सार्वजनिक ग्रंथालयाच्या मागण्यासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** केवळ ऑक्सिजनवर सुरू असलेल्या सार्वजनिक ग्रंथालयाच्या विविध मागण्या मंजूर करण्यासाठी परभणी जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शुक्रवार दि.९ ऑगस्ट रोजी लेखी निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे सार्वजनिक ग्रंथालयांच्या विविध मागण्या तात्काळ मंजूर करण्याची मागणी केली आहे.



मानवाच्या ज्ञानामध्ये भर पाडण्यासाठी महत्वपूर्ण असलेल्या लोप पावत चाललेल्या वाचन संस्कृतीला उभारी देण्यासाठी आता सार्वजनिक ग्रंथालये सरसावले असून ग्रंथलयाच्या विविध प्रलंबित मागण्या मंजूर करण्यात याव्यात यासाठी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या वतीने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे राज्यातील गाव तिथे ग्रंथालय या योजनेअंतर्गत ज्या गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालय नाहीत त्या ठिकाणी नवीन ग्रंथालयाला मान्यता देण्यात यावी, शासनाने जाहीर केलेल्या अनुदानातील शिल्लक ४०% वाढीव अनुदान तात्काळ वितरित करण्यात यावे व बंद केलेली दर्जा वाढ तात्काळ सुरू करण्यात यावी या प्रमुख मागण्यासह इतर ही मागण्यांचे उल्लेख करण्यात आला आहे.संघाच्या वतीने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी परभणी जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवेदनाची दखल घेऊन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उच्च व त्रां शिक्षण मंत्री आणि अर्थमंत्री यांनी तात्काळ दखल घेऊन वाचन संस्कृतीला उभारी देणाऱ्या ग्रंथालयांच्या मागण्या मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर परभणी जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत. परभणी जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांचे ग्रंथपाल, कर्मचारी, पदाधिकारी ,यांनी ग्रंथालयाच्या सर्व मागण्या शासनाने मान्य कराव्यात याकरिता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना परभणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष भास्करराव पिंपळकर, कार्यवाह जीवनराव लोखंडे यांच्यासह जिल्ह्यातील ग्रंथालय चालक,ग्रंथपाल, कर्मचारी, पदाधिकारी, यांची उपस्थिती होती.

## अशासकीय सदस्यपदी सौ.संगिता जाधव यांची निवड



**जिंतूर,/प्रतिनिधी-** संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी योजनेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली समितीमध्ये जिंतूर तालुक्यातील विकास जाधव व सौ. संगीता बबन जाधव यांची अशासकीय सदस्य पदी नियुक्ती पुढील तीन वर्षाकरिता करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी योजनेअंतर्गत ग्रामपंचायत इकडून प्राप्त झालेल्या कामाचा प्राधान्यक्रम व निकड लक्षात घेऊन कामाची निवड करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून बंजारा समाजातील जिंतूर तालुक्यातील विकास जाधव अंबडवाडीकर व सौ.संगीता बबन जाधव यांची पुढील तीन वर्षाकरिता नेमणूक शासन स्तरावरून करण्यात आली आहे. या योजनेत तांड्यामध्ये प्राथमिक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. या योजनेसाठी शासन स्तरावर ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

याकरिता जिल्हा अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेम ण्यात येणार असून, ही समिती बंजारा, लमाण तांडा घोषित करणे, गावठाण जाहीर करणे, तांड्यांना महसुली गाव घोषित करणे तसेच ग्रामपंचायत स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करणे या अनुषंगाने कारवाही करेल. त्याचबरोबर पाणी, वीज, शाळा, अंगणवाडी, आरोग्य, पथदिवे, गटारे अंतर्गत रस्ते इत्यादी सुविधा निर्माण करण्यासाठी ही समिती काम करणार आहे. या निवडीमुळे विकास जाधव अंबरवाडीकर व सौ. संगीता बबन जाधव यांचे सर्वस्थ अभिनंदन होत आहे.

## ई-पीक पाहणी करताना शेतकऱ्यांची दमछाक

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** यंदाच्या खरीप हंगामातील पीक पेरा नोंदणीसाठी नवीन महसूल वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ ऑगस्ट रोजी सुरुवात करण्यात आली असून या पीक पाहणी च्या नोंदणीसाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदत देण्यात आले आहे. परंतु स्मार्टफोन द्वारे नोंद करताना शेतकऱ्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत असून अद्याप तालुक्यातील ५० टक्के शेतकऱ्यांची सुद्धा ई-पिक नोंदणी झालेली नाही.




ई पीक पाहणी मुळे विविध पिकांचे स्थळ व क्षेत्र निश्चित होते. त्या आकडेवारीच्या आधारे पीक विमा परतावा, विविध कारणांनी झालेल्या पीक नुकसानी बद्दलची आर्थिक मदत देण्यासह किमान आधारभूत किमतीसह शेतीमालाचे आयात निर्यात धोरण ठरविण्यासाठी शासनास मदत होते. परंतु अनेक शेतकरी या नोंदणी बाबत संभ्रमात आहेत. त्यामुळे पीक पाहणी करताना अनेक अडचणी उद्भवत असल्याचे शेतकरी वर्गातून सांगितले जात आहे. गतवर्षीच्या सन २०२३ च्या खरीप हंगामातील सोयाबीन व कपाशीच्या बाजारभावात झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात अर्थिक नुकसान झाले. त्यामुळे राज्य शासनाकडून हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसाह्य घोषित करण्यात आले. यासाठी ईपीक पाहणी अँप द्वारे पीक पेऱ्याची नोंद केलेले शेतकरीच पात्र आहेत असे सांगितले आहे. त्यामुळे गेल्या वर्षी पिक पाहणीकडे दुर्लक्ष करणारे शेतकरी यावेळी पीक पेरा नोंदणीसाठी सरसावले असून स्मार्टफोन द्वारे शेतावर जाऊन पिकाची नोंदणी करत आहेत. परंतु हे करत असताना इंटरनेटच्या कनेक्टिव्हिटी अभावी अडथळे येत आहेत परिणामी ई पीक पाहणी अँप द्वारे पिक पेरा नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्यास विलंब लागत आहे. तालुक्यातील अनेक भागांमध्ये सर्व्हर कनेक्ट होण्यास विलंब लागत आहे तर विभागाची निवड केल्यानंतर जिल्हा, तालुका, गावाची निवड करताना अडथळे येत आहेत. त्यानंतर सर्वे /गट नंबर ची निवड केल्यानंतर त्या सर्वे नंबर च्या नकाशा वरील अचूक ठिकाणाकडे पोहोचण्यासाठी कापूस, सोयाबीन, मूग आदी पिकातून संपूर्ण क्षेत्रामध्ये फिरावे लागत आहे. दिवसभर फिरून सुद्धा अचूक स्थळ मिळत नसल्याने शेवटी शेतकऱ्यांना ई-पिक नोंदणी शिवाय निराशेने घरी परतावे लागत आहे. उभ्या पिकामध्ये चिखल तुडवत फिरावे लागत असताना सोयाबीन सारख्या निर्भोळ पिकांमध्ये सापांचा वावर असतो. त्यामुळे सापासारखे सरपटणारे प्राणी चावा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुर्गम भागात गावामध्ये इंटरनेटची रेंज व्यवस्थित पोहचत नाही त्यामुळे देखील ई- पीक पाहणी करणे अशक्य होत आहे. गतवर्षीच्या पीक पाहणी ॲप मध्ये बदल करून नवीन वर्जन विकसित केल्यामुळे या अडचणी येत आहेत. त्याकरिता गतवर्षीचेच सुलभ ई-पिक पाहणीचे वर्जन उपलब्ध करून देण्यासह तारीख वाढवून देण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

### आयुक्तांची बदली करा- पोंढे

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या आयुक्त सौ. त्पृाी सांडभोर यांची तात्काळ बदली करावी, अशी मागणी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख माणिक पोंढे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. परभणी शहराची अवस्था अत्यांत बकाल झाली आहे. मागील पंधरा दिवसांपूर्वीच पंधरा वर्षाची मुलगी आरोग्याच्या समस्येमुळे, डेंगू मुळे मृत्यूमुखी पडली, असे पोंढे यांनी या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून देत मनपा आयुक्तांची तात्काळ बदली करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या निवेदनावर उपजिल्हाप्रमुख माणिक पोंढे, लक्ष्म ीकांत कुलथे, प्रल्हाद आपशिंदे, टाक, अशोक गिराम, सचिन वाघम ारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्ह्यात २६ ऑगस्ट रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑगस्ट**

दि. २६ ऑगस्ट २०२४ मराठा, ओबीसी,धनगर व इत्तर समाजाचे, राजकीय पक्षाचे, संघटनांचे दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन रोजी, विविध प्रकारचे होणारेउपोषणे, आंदोलने, सभाचे अनुषंगाने तसेच सद्या जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने सुरु आहेत. किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होउन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आगामी कालावधीत मराठा, ओबीसी,धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते २६ ऑगस्ट २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# स्वातंत्र्यदिनी मुख्य शासकीय ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑगस्ट**

भारतीय स्वातंत्र्याचा ७८ वा स्वातंत्र्यदिन गुरुवार १५ ऑगस्ट २०२४ रोजी आहे या दिवशी बीड जिल्हयाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते होत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे गुरुवार १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजून ५ मिनिटानी मुख्य ध्वजारोहण होईल. या समारंभास सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.या सोहळयात सहभागी होणा-या सर्वांनी राष्ट्रीय पोशाख धारण करावा तसेच ८.४५ वाजेपूर्वी या ठिकाणी उपस्थित रहावे असेही आवाहन करण्यात आले आहे. या समारंभापूर्वी व नंतर अर्धा तास या कालावधीत इतर कोणताही सोहळा आयोजित करु नये, असेही आवाहन करण्यात येत आहे. जिल्हा परिषद बीड जिल्हा परिषद येथे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. हा कार्यक्रम सकाळी ७.४५ वाजता होत आहे. याला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे यांनी केले आहे.

## २०२० ते २०२३ यामधील सरसकट पिक विमा व्हावा याकरिता

# बर्दापूर फाट्यावर शेतकऱ्यांचा रस्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ ऑगस्ट**

अंबाजोगाई तालुक्यातील पिक विमा धारक शेतकऱ्यांना २०२० व २०२३ चा पिकविम्याचा परतावा करतांना पिकवीमा कंपनीने मनमानी कारभार केला असुन तालुक्यातील केवळ नगण्य शेतकऱ्यांच्या खात्यावर तुटपुंजा रक्कमा जमा केल्याचे पाहवयात आहे तसेच उरवरीत पिकविमा धारक शेतकऱ्यांना अध्याप दमडीही देण्यात आली नाही. उर्वरीत शेतकऱ्यांना येथ्या १५ दिवसात शेतकऱ्याच्या खात्यात पिकवीमा रक्कम जमा न केल्यास आम्ही सर्व शेतकरी मिळुन तहसिल कार्यालयासमोर आत्मदहन करु अशी चेतावणी आम्ही ह्या निवेदनाव्दारे प्रशासनास करत केली या बाबत दिनांक १३ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी शरद पवार पक्ष यांच्या वतीने शेतकऱ्यांच्या पिक विमा



मागणीसाठी अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर फाट्यावर रस्ता रोको करण्यात आला

यावेळी राज साहेब देशमुख, एडवोकेट माधव जाधव, कालिदास आपेट, सुदामती ताई गुट्टे, अमर भैया देशमुख यांच्यासह अनेक एक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.तरी प्रशासनसने आमच्या या आंदोलनाची दखल घेऊन लवकरात लवकर पिक विम्याचे पैसे लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे स्थानिक शेतकरी अमर मोरे, ईश्वर शिंदे, हनुमंत मोरे, ज्ञानेश्वर मोरे, गजू पटेल, राजूभाऊ शिंदे, उद्धव गाडेकर, व हनुमान गरड अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

महाराष्ट्राचे कृषीमंत्री धनंजय मुंडे व पिक विमा कंपनीच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्यावतीने असंख्य शेतकऱ्यांना सोबत घेऊन सुमारे दोन तास रास्ता रोको आंदोलन करीत तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला विमा कंपनीने तात्काळ शेतकऱ्यांना विम्याचे वाटप न केल्यास कृषी मंत्री धनंजय मुंडे परळी मतदारसंघात फिरून देण्याचा इशारा रास्ता रोको आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्याबरोबरच लोकप्रतिनिधी दिला आहे रस्ता रोको आंदोलन शांततेत पार पाडल्याबद्दल सर्व मान्यवरांचे पोलीस प्रशासनाचे आंदोलनात उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे अमोल चव्हाण यांनी आभार मानले.

# अट्टल महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ ऑगस्ट**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथील अंतर्गत तक्रार निवारण समिती महिला कक्ष, महिला बाल विकास कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र शासनाकडून आयोजित शंभर दिवसांच्या मिशन शक्ती या योजने अंतर्गत महिलांसाठी जनजागृती आणि सक्षमीकरणाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

याप्रसंगी तालुका संरक्षण अधिकारी, शाम म्हस्के, समुपदेशक आश्विनी शेप आणि वैद्यकीय सहाय्यक कदीरा शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात तालुका संरक्षण अधिकारी श्याम म्हस्के यांनी महिला विकास योजना, बाल विकास योजना, एकल पालक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजना, लाडकी बहिण योजना अशा विविध योजनांबद्दल विद्यार्थिनींना माहिती दिली आणि या योजनांचा लाभ घेण्यासाठी योजनेच्या नियम आणि अटी समजावून सांगितल्या. समुपदेशक अश्विनी शेप यांनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध तक्रार करण्यासाठी उपलब्ध असलेले हेल्पलाईन नंबर, शासकीय रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक तसेच मोबाईल प याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी पिडीत महिलांसाठी कार्यरत असलेल्या सखी फाऊंडेशन बद्दल माहिती दिली.यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्यासह मुलींच्या वसतिगृहाच्या ज्योती खरात आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला कक्ष प्रमुख डॉ. वृषाली गव्हाणे यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार डॉ. सुदर्शना बढे यांनी मानले.

# भगव्या सप्ताह निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मतदार नोंदणी व शिवसेना सदस्य नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१३ ऑगस्ट**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने भगव्या सप्ताहानिमित्त आयोजन करण्यात आले आहे तरी या सप्ताहामध्ये आज परळी शहरांमध्ये परळी विधानसभा मतदारसंघात नवीन मतदार नोंदणी करण्यासाठी आज परळी शहरातील गणेश पार विभागातर्फे या भागातील नवीन मतदार १८ वर्षांपुढील मतदारांचे नाव समाविष्ट करण्यासाठी मतदार नोंदणी करण्यात आली तसेच गणेश पार विभागात शिवसेना सदस्य नोंदणी करण्यात आली

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे युवा सेना प्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना मराठवाडा संपर्क नेते तथा शिवसेना नेते आमदार सुनील जी प्रभू साहेब शिवसेनेच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे मराठवाडा समन्वय विश्वनाथ नेरूळकर बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव बीड लोकसभा संपर्कप्रमुख माजी आमदार सुनील धांडे सर सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंभोरे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी विधानसभा संपर्कप्रमुख संजयजी भांबुरे यांच्या सूचनेवरून शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायणरावजी सातपुते शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल शिवसेना शहरप्रमुख राजेश विभुते यांच्या कल्पनेतून आज परळी शहरात गणेश पार विभागातर्फे मतदार नवीन नोंदणी व शिवसेना सदस्य नोंदणी करण्यात आली या विभागातील लोकांनी या सदस्या नोंदणी व मतदार नोंदणीस उत्तम प्रतिसाद देऊन सहकार्य केले परळी तालुका शिवसेने कडून भगव्या सप्ताहानिमित्त कार्यक्रम राबविण्यात आला यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नारायणराव जी सातपुते शिवसेना तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल शिवसेना शहरप्रमुख राजेश विभुते विधानसभा समन्वय भरत इंगळे परळी विधानसभा प्रमुख जगन्नाथ साळुंके शिवसेना उप तालुकाप्रमुख महेश उर्फ पप्पू केंद्रे शिवसेना तालुका सचिव प्रकाश साळुंके युवा सेना समन्वय सचिन लोढा शहर समन्वयक विशाल गावडे विभागप्रमुख निलेश बोटुळे नीरज कुसुमकर अजय शिंदे ऋषी पिंगळीकर बालाजी कुकर सुरेश कुकर शाखाप्रमुख हरीश पालीवाल विजय जाधव इत्यादी शिवसैनिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

# आडस येथे उद्या लोकनेते मा.आ. स्व.बाबुराव आडसकर यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१३ ऑगस्ट**

बीड जिल्ह्यात व केज तालुक्यात शैक्षणिक, सामाजिक व सहकार क्षेत्राचा विकास करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे माजी आमदार लोकनेते स्व.बाबुराव आडसकर यांची पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन बुधवार दि.१४ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी विद्यालय आडस ता. केज या ठिकाणी होणार आहे. या पुण्यतिथी निमित्ताने ह.भ.प. महादेव महाराज बोराडे पावनधाम यांचे किर्तन होईल व किर्तनानंतर भोजन होईल. या कार्यक्रमासाठी माजलगाव, केज,अंबाजोगाई, वडवणी या तालुक्यातील कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन अंबा साखर कारखाण्याचे चेअरमण रमेशराव आडसकर यांनी केले आहे.

# स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलात हर घर तिरंगा अंतर्गत ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑगस्ट**



स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलात १३, १४ व १५ ऑगस्ट हर घर तिरंगा अभियानाच्या निमित्ताने ध्वजारोहण करण्यात येत आहे.१३ ऑगस्ट रोजी विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेशजी जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.यावेळी विद्यार्थ्यांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली. सर्वांनी महाराष्ट्र गीत गायले.याप्रसंगी मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले.यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती म्हणून विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेशजी जगताप, मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी, श्री. प्रदिप जोशी, पर्यवेक्षक श्री दत्तात्रय तांबारे विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे हे उपस्थित होते.

# ड्रोनबाबद कूठलीही अधिकृत माहिती नाही-नीरज राजगूरू

**नागरिकांनी सतर्क राहावे व पोलिसांना संपर्क करावा**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ ऑगस्ट**

गेवराई तालुक्यातील विविध गावांत ड्रोनच्या गिरट्या पहावयास मिळत आहेत याबाबद अद्याप तरी प्रशासनाकडे याबाबद कूठलीही अधिकृत माहिती नाही नागरिकांनी अफवावर विश्वास ठेऊ नये परिसरात चोर किंवा असे ड्रोन आढळून आल्यास त्यांची माहिती पोलिस प्रशासनाला द्यावी जर रेंज मध्ये ड्रोन आढळल्यास ते तात्काळ पाडले जातील अशी माहिती उपविभागिय पोलिस अधिकारी नीरज राजगूरू यांनी दिली आहे.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,तालुक्यातील अनेक ग्रामिण भागात रात्रीच्या वेळी ड्रोन आढळून येत आहेत काही अपवाद वगळता काही ठिकाणी किरकोळ चोरीचे प्रकार समोर आले आहेत ग्रामिण भागातील नागरिक यांनी या बाबद दक्षता घ्यायची आहे तसेच शक्य असेल त्या ठिकाणी सीसीटिव्ही बसावेत जनावरे,व आपल्या गावात किंवा परिसरात अनओळखी ईसम आढळून आल्यास त्यांची माहिती तात्काळ संबंधीत पोलिस ठाण्यात किंवा आपल्या परिसरातील बीट आमलंदार याला द्यायची आहे सुरक्षेतेबाबद गेवराई तालुक्यातील येर्नाय़ा गेवराई, चकलांबा,तलवाडा,दूरक्षेत्र उमापुर,व दूरक्षेत्र मादळमोही याठिकाणचे प्रमुखांना सुचना देण्यात आल्या आहेत तसेच रात्रीची गस्त देखील वाढविण्यात आली आहे नागरिकांनी सतर्क राहावे व अफवावर विश्वास ठेऊ नये असे अवाहन ही त्यांनी नागरिकांना केली आहे तसेच या बाबद शोध सुरू आहे काळजी करण्याचे कारण नाही ड्रोन बाबद कसलीही माहिती प्रशासनाला मिळाली तर ती कळवली जाईल.असेही उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगूरू यांनी स्पष्ट केले आहे.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑगस्ट**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्त भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना त्यांनी ग्रंथ वाचनाचे महत्व विशद करताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास व व्यक्तीमत्व जडण घडणीत वाचनाचे महत्व सांगीतले.ग्रंथ प्रदर्शनात शब्दकोष,ज्ञानकोष, चरित्रे, आत्मचरित्र ,स्पर्धा परिक्षेचे पुस्तके तसेच डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची ग्रंथसंपदा ग्रंथ प्रदर्शनात मांडण्यात आली आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल शेख जी.आय.यांनी केले. या प्रसंगी डॉ.सुधाकर गुट्टे,डॉ.विश्वांभर देशमाने, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.ए.एस.खान, कमवि उपप्राचार्य काकडे एन.आर.,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदीसह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. ग्रंथ प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय लिपीक खाडे एल.डी, मुळे एस.एस.,सय्यद जैद,आकाश घोडके यांनी परिश्रम घेतले.

# कवडगाव ते श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी पायी दिंडी सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**वडवणी दि.१३ ऑगस्ट**



वडवणी तालुक्यातील कवडगाव बुद्रुक येथील भाविक भक्त , भजनी मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने गेल्या तेरा वर्षापासून २० व्या शतकातील महान विभूती ह.भ.प वैकुंठवासी सदुरु किसन बाबा महाराज गोरक्षनाथ टेकडी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पायी दिंडी सोहळा आयोजित केला जातो यावर्षी या पायी दिंडी सोहळ्याचे हे १३वे वर्ष आहे. बाबांच्या पुण्यस्मरण निमित्त या पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान दिनांक १७/८/३०२४ रोजी सकाळी ग्राम प्रदक्षिणा करून मिरवणूक व बजरंग बली चे दर्शन घेऊन प्रस्थान होणार आहे. हि दिंडी मोरेवाडी सुरडी मार्गे संध्याकाळी ताडसोन्ना येथे मुक्कामी येईल रविवार दिनांक १८/८/२०२४ लां घाटसावळी तांडा मार्गे दिंडीचा मुक्काम रात्री श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होईल दिनांक १९/८/२०२४ श्रावण शुद्ध पौर्णिमा सोमवारी सकाळी दिंडी प्रदक्षिणा होऊन ह.भ.प सद्गुरु किसन बाबा महाराज पुण्यतिथी उत्सव सोहळ्याचे काल्याचे किर्तन श्रवण करून व महाप्रसाद घेऊन दिंडीची सांगता होणार आहे .

या पायी दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन दिंडीचा आनंद घ्यावा असे आवाहन दिंडी चालक, कवडगाव ग्रामस्थ आणि भजनी मंडळ यांनी केले आहे.

# जीवनात यशस्वी होण्यासाठी भगवंताला शरण जा-श्री.शिवानंद शिवाचार्य उमलुरकर महाराज

## श्रावणमास अनुष्ठान रुद्र पूजा व गुरुमाऊलींचे अमृत उपदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑगस्ट**

येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे श्रावण मासानिमित्त गुरूवर्य प.पु.ष.ब्र.१०८ तपोरत्न श्री. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर यांचे अनुष्ठान चालू आहे. या अनुष्ठानात शिवपाठ , सामुहिक ईष्टलिंगपुजा, गाता भजन गुरूवर्यांचे अमृत उपदेश व श्रोते यांना शिवमहिमा महाराज सांगत आहेत. भगवान शिवशंकर हे भक्तवत्सल आहेत ज्या ज्या ठिकाणी शिवाचा पूजा पाठ, पठण, सेवा व शिव आराधना असते त्या त्या ठिकाणी भगवान शिवाचा वास आहे असे महत्त्वपूर्ण उद्धार महाराजांनी स्रोतेमंडळींना सांगितले.

कपिलधार येथे जमलेल्या सर्व श्रोतेगणांना शिवचार्य महाराजांनी शिवमहिमा सांगताना रामायणातील एक उदाहरण सांगितले म्हणजे



प्रभुरामचंद्र आणि सर्व वानरसेना लंकेवर विजय करण्यासाठी समुद्र तीरावर गेली होती. समुद्र तीरावर प्रत्यक्ष भगवान प्रभू रामचंद्र आणि शिवलिंग स्थापून त्यांची आराधना केली आणि आपले कार्य पूर्ण व्हावे यासाठी शिवाला साकडे घातल आणि पुढे लंका विजय प्राप्त केला .याबरोबरच महाराजांनी साधू संतांचे अनेक दाखले दिले. या धर्तीवर संताचा महिमा आगात आहे संतांमध्ये दया ,करुणा ,प्रेम, शांती व सहनशीलता ही ओतप्रोत भरलेली असते. महाराज म्हणाले आपल्या जीवनामध्ये आपण या संतांना शरण गेलं की आपलं इच्छित कार्य पूर्ण होते यामध्ये शंकाच नाही.या तपोअनुष्ठान कार्क्रमाला आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा,बीड ,कपिलधारवडी,आदी विविध राज्यातून तसेच पंचक्रोशीतील असंख्य भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

# धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत 'आर्य चाणक्य'ची तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशभर सुरू असलेल्या हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत आज तिरंगा रॅली काढली.

या तिरंगा रॅलीत विद्यार्थी विद्यार्थिनींनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी कार्य केलेल्या महापुरुषांचा जयजयकार करत देशभक्तीचे दर्शन घडवले.

शाळेचे मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे यांच्या हस्ते या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. तर यानिमित्ताने प्रशालेत करण्यात आलेल्या ध्वजारोहण प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका देशमाने यांच्या हस्ते संपन्न झाले.

ही रॅली आर्य चाणक्य विद्यालयापासून समर्थनगर मार्गे काढण्यात आली होती.




## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### पाथर्डीच्या जि.प. शाळेत तिरंगा रॅली

**कळंब, दि.१३ ऑगस्ट -**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे हर घर तिरंगा अंतर्गत विद्यार्थ्यांची तिरंगा रॅली काढण्यात आली. याप्रसंगी ग्रामस्थ, ग्रामपंचायत व शाळेच्या वतीने तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले. गावातील प्रमुख रस्त्यांवरुन रॅली काढण्यात आली. घरोघरी सन्मानपुर्वक तिरंगा ध्वज फडकावला आहे. विद्यार्थ्यांनी विविध देशभक्ती पर घोषणा दिल्या. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, आरोग्य उपकेंद्र इत्यादी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. या तिरंगा रॅलीमध्ये सरपंच नानासाहेब पिंगळे, अर्जुन जाधव, संदेश जोशी, ठाकर, धनंजय गव्हाणे, सरोजिनी पोते, मनीषा पवार, सुरेखा भावले, वंदना पिंगळे, मंदाकिनी काकडे, विद्यार्थी, ग्रामस्थांनी सहभाग घेतला.



### कांबळे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तेर, दि.१३ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर सोसायटीचे गटसचिव डी.बी. कांबळे सेवानिवृत्त झाल्याबद्दल धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा तेरचे शाखाधिकारी एस.एम. मांदळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अनिल पतंगे, अनिल कावळे, नामदेव वाकुरे, सुरेश बुकन उपस्थित होते.




### राजीव गांधी विद्यालयात ध्वजारोहण

**जळकोट, दि.१३ ऑगस्ट -**

हर घर तिरंगा अभियानांतर्गत राजीव गांधी विद्यालय, हंगरगा (नळ) येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. दि.१३ रोजी राजीव गांधी विद्यालय, हंगरगा (नळ) येथे देशभर चाललेल्या हर घर तिरंगा अभियान अंतर्गत सुरुवातीस गावातून तिरंगा रॅली काढण्यात आली. त्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक घोडके यांच्या हस्ते सर्व अतिथीच्या उपस्थितीत विद्यालयाच्या नवीन इमारतीवर पहिला तिरंगा ध्वज फडकावला. यावेळी सरपंच अतुल कलशेट्टी, दयानंद चौगुले, प्रवीण चौगुले, दिलीप पाटील, संतोष बिराजदार, दादा मुदगडे, मोहन कांबळे, ग्रामसेवक पाटील, तलाठी जोगदंड व समस्त ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

### संपर्क प्रमुखपदी आश्रूबा कोळेकर

**तेर, दि.१३ ऑगस्ट -**



राष्ट्रीय समाज पक्षाच्या मराठवाडा विभाग संपर्क प्रमुखपदी धाराशिव तालुक्यातील कोळेकरवाडी येथील आश्रूबा कोळेकर यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश अध्यक्ष काशीनाथ शेवते व मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर यांनी आश्रूबा कोळेकर यांची निवड केली आहे.

### स्वातंत्र्यादिनानिमित्त प्रश्न मंजुषा स्पर्धा

**कदेर, दि.१३ ऑगस्ट -**

भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय, तलमोड (ता.उमरगा) शाळेत स्वातंत्र्य दिन यानिमित्त दि.१३ ऑगस्ट रोजी प्रश्न मंजुषा घेण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापक जयवंत मोरे, सहशिक्षक माळी के.बी., जाधव जे.जी., सूर्यवंशी एम.आर., राठोड एन.एच., बिराजदार ए.एस., वडदरे एन.टी., शिक्षकेत्तर कर्मचारी पाटील ए.एस. मोरे व विद्यार्थी उपस्थित होते.



### शालेय लॉन टेनिस स्पर्धा संपन्न

**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**

जिल्हास्तरीय शालेय लॉन टेनिस स्पर्धा तुळजाभवानी स्टेडियम येथील लॉन टेनिस कोर्ट वर पार पडल्या. स्पर्धेचे उद्धाटन भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे व दत्ता कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडले. दोघांनीही श्रीफळ फोडून स्पर्धेचे उद्धाटन करून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, अभय इंगळे, क्रीडाधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, सुजित साळुंके, राजाभाऊ कारंडे, अमोल राजेनिंबाळकर, अजिंक्य राजेनिंबाळकर, गणेश मोरे, क्रीडा कोच डिंपल ठाकरे, अक्षय बिराजदार, अजिंक्य वराळे, इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक जिल्हा लॉन टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष युवराज नळे यांनी केले. तर आभार सचिव हर्षद जैन यांनी मानले.

# भाजपाचे जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारीत कार्यकारिणीची धाराशिवात आज बैठक

## जिल्ह्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी उपस्थित राहावे : जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य-पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारित कार्यकारिणीची बैठक बुधवार, १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता स्वस्तिक मंगल कार्यालय, बार्शी नाका, धाराशिव येथे आयोजित करण्यात आली आहे. या जिल्हास्तरीय अधिवेशन व विस्तारित कार्यकारिणी बैठकीस भाजपाचे आजी-माजी पदाधिकारी, आमदार, माजी आमदार, लोकसभा व विधानसभा निवडणूक लढलेले उमेदवार, प्रदेश पदाधिकारी, प्रदेश कार्यकारिणी



सदस्य, विविध आघाड्या, प्रकोष्ट, मोर्चे जिल्हा, तालुकाध्यक्ष, महामंत्री, तालुका पदाधिकारी, विद्यमान नगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, माजी नगरसेवक, सरपंच, चेअरमन, सहकारी बँकेचे संचालक, शिक्षण संस्था संचालक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य-पाटील यांनी केले आहे.

जिल्हास्तरीय अधिवेशनात भारतीय जनता पार्टीचे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री माजी आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर हे प्रमुख मार्गदर्शक असून तुळजापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने हे अधिवेशन आणि विस्तारित कार्यकारिणीची बैठक महत्त्वपूर्ण आहे.

त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य-पाटील यांनी केले आहे.

## 'शिवस्वराज्य यात्रा' आज तुळजापूरात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ ऑगस्ट**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची राज्यभर सुरू असलेली शिवस्वराज्य यात्रा शहरात बुधवार दि.१४ ऑगस्ट रोजी येणार असून सकाळी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतल्यानंतर धाराशिव बायपास पुल रोड जवळील केवडकर कार्यालय ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सभेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रवादीचे प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील, खा. अमोल कोल्हे, जितेंद्र आव्हाड, आ. रोहित पवार, राजेश टोपे, रोहिणी खडसे, महेबूबभाई शेख, पंडित कांबळे, जीवन गोरे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.




या शिवस्वराज यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सक्षणा सलगर, तालुकाध्यक्ष धर्यशिल पाटीलसह सर्व शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## तुळजापूर येथील नविन बस स्थानकाचे सप्टेंबर महिन्यात उद्घाटन

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ ऑगस्ट -**

नव्याने बांधकाम होत असलेल्या तुळजापूर येथील बसस्थानकाचे सप्टेंबर महिन्यात होणार उद्घाटन होणार असून शहरवासी, भाविकांच्या सेवेत नविन बसस्थानक सुरु होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

दि.१२ ऑगस्ट रोजी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नव्याने बांधकाम होत असलेल्या बसस्थानकाला भेट दिली. शारदीय नवरात्र दि.३ आक्टोंबरला घटस्थापन होत असल्या कारणाने भाविक, शहर वासियांच्या दृष्टी कोणातुन शहरातील मध्यवर्ती असणारे बसस्थानक हे लवकर सुरु व्हावे या दृष्टी कोणातुन संबंधीत काँट्रक्ट, एस.टी. महामंडळाचे संभाजीनगर, धाराशीवचे सर्व अधिकारी यांची सर्कीट हाऊस (रेस्टहाऊस) येथे बैठक घेतली. तसेच सदरील होत असलेल्या कामाची पहाणी समक्ष जागेवरती जाऊन केली. पुढील महिन्यापर्यंत लवकरात लवकर बस स्थानक हे भाविकांसाठी सुरु व्हावे बाबत सुचना दिल्या. तथा कामाच्या दर्जा बाबतही सांगितले.



बैठकीस विनोद गंगणे, सचिन रोचकरी, आनंद कदले, सतिश दंडनाईक, नरेश अमृतराव, लखन पेंदे, सचिन पाटील, नरसिंग बोदले, राजेश्वर कदम, राजेश बच्चु शिंदे, माऊली भोसले, धैर्यशील दरेकर, रत्नदीप भोसले, आण्णाप्पा पवार बैठकीस उपस्थित होते.

## 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत नळदुर्ग न.प.च्या वतीने विद्यार्थ्यांची प्रभात फेरी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ ऑगस्ट -**

हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत दि.१३ ऑगस्ट रोजी नळदुर्ग नगर पालिकेच्या वतीने शहरातुन शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये शालेय विद्यार्थ्यांबरोबरच नगरपालिकेचे कर्मचारी, बचत गटाच्या महिला, सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हर घर तिरंगा उपक्रमाअंतर्गत दि.१३ ऑगस्ट रोजी नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने शहरातुन शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली.

नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी झेंडा दाखवुन प्रभात फेरीची सुरुवात केली. ही प्रभात फेरी नगरपालिकेपासुन निघाल्यानंतर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, शास्त्री चौक, भवानी चौक, चावडी चौक, क्रांती चौक, किल्ला गेट, कुरेशी गल्ली, हुतात्मा स्मारक मार्गे नगरपालिकेत आल्यानंतर प्रभात फेरीचे विसर्जन करण्यात आले. या प्रभात फेरीमध्ये जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा, जि.प. प्रशाला मुलांची मराठी व उर्दु शाळा या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

त्याचबरोबर या प्रभात फेरीमध्ये नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक अजय काकडे, लेखापाल गोविंद अंबर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुरज गायकवाड, नगर अभियंता वैभव चिंचोले, पाणी पुरवठा अभियंता दिक्षा शिरसाट, दीपक कांबळे, समीर मोकाशी, रानुबाई सपकाळ, माधुरी जाधव, फुलचंद सुरवसे, बाबा डुकरे, दस्तगीर जागीरदार, प्रविण चव्हाण, नितीन पवार, खंडु शिंदे, अमित गायकवाड, शहाजी येडगे, खंडु नागणे, सोनु देडे, कल्पना गायकवाड, जिजाबाई जाधव, वहिदा सौदागर, सुनंदा जाधव, रंजना गायकवाड, इंदुमती भोसले यांच्यासह सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.

## विभागीय कृषी सहसंचालक दिवेकर यांची प्रक्षेत्रास भेट

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१३ ऑगस्ट -**

विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर यांनी धाराशिव तालुक्यातील हिंगळजवाडी गावात भेट देऊन विविध योजना अंतर्गत राबवण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रात भेट दिली.

सोयाबीन उत्पादक शेतकरी बाळासाहेब नाईकनवरे यांच्या क्षेत्रावर अंबाजोगाई येथील कृषी विज्ञान केंद्राचे कृषी विद्या वेत्ता वसंत सूर्यवंशी यांनी सोयाबीनवरील युनो मुझे पिवळा विषाणू बाबत माहिती देऊन नियंत्रणाचे शेतकरी यांना उपाय सांगितले.

## आठवडी बाजारात ठेकेदारास कर वसुलीस करण्यास नागरिकांचा मज्जाव

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१३ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील आठवडी बाजारात मुरूम टाकण्याची मागणी नागरिकांनी ग्राम पंचायतकडे निवेदनाद्वारे केली होती. परंतू ग्राम पंचायतने बाजारात मुरूम टाकला नसल्याने संतप्त नागरिकांनी ठेकेदारास कर वसुली करू दिली नाही.

तेर येथील आठवडी बाजारात ग्रामपंचायत यांनी लवकरात लवकर मुरूम टाकण्यात यावा अन्यथा पुढील आठवड्यात आठवडी बाजारात ठेकेदारास कर वसुली करू दिली जाणार नाही, असा इशारा नागरिकांनी तेर ग्राम पंचायतला निवेदनाद्वारे दिला होता. परंतू ग्रामपंचायत यांनी मुरूम टाकला नसल्याने सोमवार १२ ऑगष्टला तेर येथे आठवडी बाजार असल्याने ठेकेदारास कर वसुली सचिन देवकते, शिवाजी पडुळकर, विठ्ठल कदम यांनी करु दिली नाही.

सध्या ग्राम पंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्याने आठवडी बाजारात मुरूम टाकला नाही. त्यामुळे येत्या २ ते ३ दिवसात ग्रामपंचायत कडून आठवडी बाजारात मुरूम टाकण्यात येईल. त्यामुळे आठवडी बाजारातील कर वसुली करण्यास आपणाकडून सहकार्य करावे, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर ठेकेदारास कर वसुली करू देण्यात आली. ग्रामपंचायतने लेखी आश्वासन दिल्यानंतर ठेकेदारास कर वसुली करू दिली.

## शिवबा नगर जि.प. शाळेच्या आवारात गटारीचे साम्राज्य

### उपाया-योजना करण्याची नागरिकांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१३ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील कदेर गावात जि.प. शाळेचा समोर रस्त्यावर गटारीचे साम्राज्य पसरले आहे. पावसाचे पाणी आणि लोकांचे घरातील आंघोळीचे व घाण पाणी हे रस्त्यावर सोडले जात आहे.तो रहदाळीचा रस्ता आहे. तो शिवबा नगर येथील मुख्य रस्ता आसून त्यातून महिला, पुरुष, शाळकरी मुले यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

गटारीमुळे त्या पाण्यावर शेवाळे स्वरूप तयार झाले आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून त्यातून वाहने घेऊन जाणं सुध्दा अवघड झाले आहे. तिथे राहणारे लहान मुले आणि शाळेत शिकणाऱ्या मुलांना डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड अशा आजारांना सामोरे जावे लागेल



याची भीती मात्र सर्वांना लागली आहे. जिल्हा परिषद शाळेत गरीब आणि शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत आहेत.

सदरील लहान मुले याच घाण पाण्यातून येत जात आहेत. आणि दुपारी जेवणाचा सुट्टीमध्ये हे लहान मुले जेवण्यासाठी मैदानात बसतील तेव्हा यातील डोळ्याला न दिसणारे लहान जंतू त्यांचा जेवणात जाऊन विषबाधा होऊ शकते. यामुळे पालकात भीतीचे वातावर निर्माण झाले आहे. हे सर्व प्रकार प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहत आहे; परंतु काही उपाय योजना करत नाही. त्यामुळे लोकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.


या साचलेल्या घाण गटारीचा पण्यावरती काहीतरी उपाय योजना प्रशासनाने करावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

## २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादकांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी ई-पीक पाहणीची अट लावू नये : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ ऑगस्ट -**


२०२३ च्या खरीप हंगामामध्ये कापूस व सोयाबीन पिकाला अत्यंत कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. त्या नुकसानीवर उपाययोजना म्हणून राज्य शासनाने सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे, दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक पाहणी पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे, असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरिता पात्र राहतील अशी अट टाकण्यात आली आहे. ही अट रद्द करावी, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली आहे.

यावेळी पाटील यांनी पत्रात म्हटले की, शेतकरी एक हेक्टरमध्ये जवळपास १५ क्विंटल सोयाबीनचे उत्पन्न घेतात. २०२१-२२ मध्ये सोयाबीन पिकाचा सरासरी भाव १० हजार रुपये क्विंटल होते. मोदी सरकारचे व्यापारीहित धोरण शेतकऱ्यांना मारक ठरले आहे. सोयाबीन पिकाचे भाव कमी होऊन आता चार ते साडेचार हजार रुपये प्रति क्विंटल एवढे झाले आहेत. मोदी सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे हेक्टरी ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. राज्य सरकार एक क्विंटल सोयाबीन पिकाचा भाव म्हणजेच हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य देऊन शेतकऱ्यांची चेष्टा करत आहे. त्यातही शासन निर्णयात लावलेल्या जाचक अटीमुळे अनेक शेतकरी अर्थसहाय्यापासून वंचित राहणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. २०२३ मध्ये शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केली परंतु त्यावेळी निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीमुळे त्यांची नोंद ऑनलाईन होऊ शकली नाही. त्यामुळे ई-पीक पाहणीची अट न लावता सातबारावर पीक पेऱ्यात सोयाबीन व कापूस पिकाची नोंद असेल किंवा विमा भरताना पिकांची खात्री केल्याशिवाय विमा भरून घेतला जात नाही. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन व कापूस पिकाचा विमा भरला आहे अशा नोंदी ग्राह्य धरून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देणे आवश्यक आहे. जेणेकरून सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी अर्थसहाय्यापासून वंचित राहणार नाहीत.



२०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीची अट न लावता सातबारावर पीक पेऱ्यात सोयाबीन व कापूस पिकाची नोंद असेल वा ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन व कापूस पिकाचा विमा भरला आहे अशा सर्व शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यात यावे, असेही आ. पाटील यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत महारॅली



**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१३ ऑगस्ट -**

तालुक्यातील कसगी गावात सिद्धेश्वर विद्यालयाचा वतीने हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्याचा गौरवशाली परवा निमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढाणाच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरूपी मनात राहावी व त्यांचे स्मरण व्हावे, या उद्देशाने दि.९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियानांतर्गत कसगी गावात तिरंगा ध्वज घेऊन अभियान राबवण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. विठ्ठल पटणे, विठ्ठल बदोले, विजयसिंह राजपूत, मुख्याध्यापक आर.एम. माशाळे, सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महारॅलीचे आयोजन करून गावातील प्रत्येक घरावरती १५ ऑगस्ट रोजी भारत देशाच्या ७८ वा स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापनानिमित्त तिरंगा ध्वजारोहण करावे, असे आव्हान विद्यालयाच्या वतीने करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com


(छाया: नरेंद्र गडप्पा)

# बांगलादेश मधील हिंदूवरील आत्याचाराच्या निषेधार्थ
# १७ ऑगस्ट रोजी नांदेड बंद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**

बांगलादेशमध्ये हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ दि.१७ ऑगस्ट रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने नांदेड जिल्हा बंदचे आयोजन करण्यात आले आहे. या बंदमध्ये सर्व व्यापारी, शैक्षणिक संस्था आदींनी सहभाग घेवून बंद यशस्वी करावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे प्रांत कार्यकारिणी सदस्य कृष्णा देशमुख यांनी पत्रकार परिषदेत केले.

या पत्रकार परिषदेस विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ.रवीकुमार चटलावार, व्यापारी असोसिएशनचे हर्षद शहा, गणेश महाजन, राजेंद्र हुरणे, प्रेम फेरवानी, निखिल लातूरकर, प्राचार्य सु.ग.चव्हाण, दिपक बोधने, राजकुमार बोडसे, सुदेश पईतवार, शशिकांत पाटील आदींची उपस्थिती होती.

बांगला देशमध्ये मागील आठ दिवसांपासून हिंदूंवर अत्याचार सुरु आहेत. अनेक हिंदू मंदिरे उदध्वस्त करण्यात आली आहेत. महिलांवर बलात्काराच्या घटना देखील घडत आहेत. अत्याचाराची आतापर्यंतची हि चौथी वेळ असून, या अत्याचाराच्या विरोधात मुस्लिम संघटना गप्प का? असा प्रश्न कृष्णा देशमुख यांनी उपस्थित केला. दि.१७ ऑगस्ट रोजी पुकारण्यात आलेल्या बंदच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे आगारप्रमुख, जिल्हाधिकारी तसेच शिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेण्यात येणार आहे. या बंदमध्ये रामजन्मोत्सव समिती, मारवाडी युवा मंच, सराफा असोसिएशन, बागेश्वर धाम आदीसह अनेक संघटना सहभागी असून, सर्वांनी हा बंद यशस्वी करावा, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने कृष्णा देशमुख यांनी केले.

# शेतकऱ्यांना पीक विम्यापोटी सरसकट अर्थसाह्य करा : माजी खा. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**

सन २०२३ मध्ये खरीप हंगामासाठी ई पीक पोर्टलवर ज्यांनी सोयाबीन आणि कापूस लागवडीची नोंदी केली अशा शेतकऱ्यांना अर्थसहाय देण्याची केलेली घोषणा मागे घेऊन तातडीने सरसकट अर्थसाह्य करावे अशी मागणी माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली आहे.



गतवर्षी म्हणजे सन २०२३ मध्ये खरीप हंगामाच्या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले होते. सोयाबीन आणि कापूस या नगदी पिकाला मोठा फटका बसल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. अशा परिस्थितीत पूरग्रस्त भागाचे पंचनामे करून तातडीने पिक विमा मंजूर करण्यासाठी ही शेतकऱ्यांकडून विनंती करण्यात आली होती. या अनुषंगाने शासन दरबारी पाठपुरावाही करण्यात आला मात्र पीक विम्याचा प्रश्न भिजत पडला आहे. अशा परिस्थितीत सन २०२३ च्या खरीप हंगामासाठी ई पीक ॲपद्वारे कापूस आणि सोयाबीन लागवडीची नोंद केलेल्या नोंदणीकृत शेतकऱ्यांनाच अर्थसहाय्य देण्याची घोषणा करण्यात आली आहे. यानुसार ०.२० हेक्टर खालील शेतकऱ्याला १००० रुपये तर ०.२० हेक्टरच्या वरील दोन हेक्टर मर्यादा ठेवून पाच हजार रुपये अर्थसाह्य करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्या अनुषंगाने कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे. मात्र हा निर्णय शेतकऱ्यांचे हितासाठी मारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी काही त्रुटीच्या कारणास्तव किंवा तांत्रिक अडचणीमुळे ई पीक विम्याच्या पोर्टलवर नोंदणी केल्या नाहीत अशा शेतकऱ्यांनाही अर्थसहाय्य देण्यात यावे. सध्याचा काळ हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत जोखमीचा आणि आर्थिक दृष्ट्या अडचणीचा काळ आहे. ही बाब लक्षात घेता राज्य शासनाने तातडीने हा निर्णय बदलत २०२३ मधील कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना सरसकट अर्थसहाय्य करावे अशी मागणी ही माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली आहे. मागणीचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे पाठवले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### हू.ज.पा. मध्ये अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**हिमायतनगर-**हिमायतनगर येथील हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. उज्वला सदावर्ते मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दै. तरुण भारत चे प्रतिनिधी मनोज पाटील हे होते. ते बोलताना म्हणाले की अहिल्याबाई होळकर ३१ मे १७२५ ते १३ ऑगस्ट १७९५ या भारतातील मराठा माळवा राज्याच्या एच ओलकर राणी होत्या. तिला भारतातील सर्वात दूरदर्शी महिला शासन एक मानले जाते. ती तिच्या शहाणपणासाठी धैर्यासाठी आणि प्रशासकीय कौशल्यासाठी प्रसिद्ध होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून प्राध्यापक डॉ. डि. के . कदम होते. अध्यक्षीय समारोपात ते म्हणाले की अहिल्याबाई होळकर हिंदू मंदिराच्या महान प्रवर्तक आणि निर्मात्या होत्या. तिने भारतभर शेकडो मंदिरे आणि धर्मशाळा बांधल्या. अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील सध्याच्या अहमदनगर जिल्ह्यातील चोंडी गावात झाला. त्यांचे वडील माणकोजीराव शिंदे हे गावचे पाटील होते. त्यांचा मृत्यू १३ ऑगस्ट १७९५ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी अहिल्याबाईंचे निधन झाले. अहिल्याबाईंच्या पश्चात त्यांचे सेनापती आणि पुतणे तुकोजीराव होळकर आले. त्यांनी लवकरच १७९७ मध्ये त्यांचा मुलगा काशीराव होळकर यांच्या बाजूने सिंहासनाचा त्याग केला. अशी माहिती बोलताना सांगितले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ. डीसी देशमुख सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉ . एस. एन. भदरगे सर यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### 'स्वातंत्र्य सूर्याची किरणे' या ग्रंथाचे प्रकाशन

**नांदेड -**भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व दिवशी डॉ. अनंत दा. राऊत लिखित 'स्वातंत्र्य सूर्याची किरणे' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ बुधवार, दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी १०-३० वाजता कै.नरहर कुरुंदकर सभागृह, पीपल्स कॉलेज नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.व्यंकटेश काब्दे यांच्या हस्ते होत आहे. सुप्रसिद्ध नाटककार प्रा. दत्ता भगत हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी घेतले तिर्थक्षेत्र काळेश्वरचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,१३ ऑगस्ट -**

नांदेड शहरालगत पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या तिर्थक्षेत्र काळेश्वर विष्णूपुरी येथे दुसऱ्या श्रावण सोमवार निमित्ताने भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले. यावेळी नांदेड जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार आदींनी दर्शन घेतले.

श्रावण महिन्यातील दुसरा सोमवारी दि. १२ ऑगस्ट रोजी भाविक भक्तांनी मोठया प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी पुजारी गणेशअप्पा महाराज धनमणे यांच्या उपस्थितीत विधीवत पुजन व आरती नंतर देव दर्शनासाठी भाविक भक्तांना



सोडण्यात आले. सकाळी नांदेड जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी तिर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात विधीवत पुजन करून दर्शन घेतले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, गटविकास अधिकारी पांडुरंग नारवटकर, विस्तार अधिकारी गोविंद मांजरमकर, पांडुरंग नारवटकर, विठ्ठल कांबळे, यांच्यासह माजी शिक्षण विस्तार अधिकारी बंडु अमदुरकर उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत विष्णुपूरी व विश्वस्त समिती यांच्या तर्फे सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, विश्वस्त समितीचे सचिव शंकरराव हंबर्डे, बालाजी हंबर्डे, सतिश भेंडेकर, ग्रामसेवक संजय कानोडे, शिक्षक उदय हंबर्डे, निशांत पळणाटे, भास्कर हंबर्डे यांनी सत्कार केला. भाविक भक्तांसाठी सुमित मोरगे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी देवस्थान परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिकारी, पोलीस अमलंदार, महिला पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांच्या कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

# अंगणवाडीत बालकांच्या खाऊमध्ये किडे

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,१३ ऑगस्ट -**

तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील अंगणवाडी सेविका खाऊ मध्ये भोंगे किडे पाहूनही खाऊ बनवून बालकांना देत असल्याची तक्रार दि. ९ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष पूजाताई माधव पाटील व्यवहारे यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती मुदखेड यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे.

डोंगरगाव येथील लहान बालकांचे आरोग्य धोक्यात असून अंगणवाडत खाऊ मध्ये भोंगे, किडे असल्याचा प्रकार दि.९ ऑगस्ट रोजी उघडकीस आला असून अनेक दिवसापासून खाऊ व्यवस्थित शिजवा किंवा खाऊ बघून शिजवा अशी सूचना मागील काही दिवसांपूर्वी स्थानिक डोंगरगाव येथील महिलांनी अंगणवाडीतील सेविकेला दिली होते. परंतु अंगणवाडीतील सेविकांना वारंवार सांगून देखील ऐकत नसल्याचे या निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे. अंगणवाडी सेविकेला वारंवार सूचना देऊन देखील अंगणवाडीतील सेविका ऐकत नाही त्यामुळे गावातील अंगणवाडीत जाणाऱ्या बालकांच्या आरोग्याच्या



जीवितास धोका निर्माण झाल्यास काय करावे असा प्रश्न देखील स्थानिक नागरिकांच्या मनात पडला असून या घटनेची चौकशी करून तात्काळ संबंधितावर कारवाई करण्यात यावी असे निवेदन बाल विकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती मुदखेड यांच्याकडे देण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष पूजाताई माधव पाटील व्यवहारे, शहराध्यक्ष महंमद बुराण, शेख इरफान, मोहम्मद साजिद, गजानन बोडके, माधव पाटील व्यवहारे, ज्ञानेश्वर गायकवाड, शेख हाकिम, शेख खाजा भाई, दिलीप सरोदे, शेख मुखीद शेख जानेमिया यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# किनी येथील शेतकऱ्यांची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,१३ ऑगस्ट -**

साततच्या नापिकीमूळे कर्जबाजारी झालेल्या तरुण शेतकऱ्यांनी कंटाळून घरात दोरीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दि.७ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता घडली आहे.



किनी व परिसरात आत्महत्या करण्याचे सत्र चालु आहे की काय असे दिसते.मागील आठ दिवसापूर्वी किनी येथील नरेशरेड्डी कुंटालवाड नामक तरुण शेतकऱ्यांनी कर्ज बाजारीस कंटाळून आत्महत्या केली होती. तर लगेच दोन दिवसाला म्हणजे दि.७ ऑगस्ट रोजी किनी येथील लक्ष्मण धर्मन्ना कडकुंटवाड पद्मशाली वय ३८ या तरुण शेतकऱ्यांनी सततच्या नापीकीमूळे आणि बॅंकेतील कर्ज न फेडता येत असल्याने अखेर त्याने दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घरातील सर्व शेतात गेल्याचे पाहून त्याने घरातील तुळईला दोरीचा फास घालुन आत्महत्या केली आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने कडकुंटवाड परिवारावर संकट कोसळले कै. लक्ष्मण कडकुंटवाड याच्या पश्चात आई दोन मूले एक मुलगी, पत्नी असा परिवार आहे.

# होमगार्ड नोंदणीच्या दिनांकात बदल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**

नांदेड जिल्हा होमगार्डमधील रिक्त असलेला होमगार्ड अनुषेष भरण्यासाठी होमगार्ड नोंदणीचे आयोजन १६ ऑगस्टपासून पोलीस मुख्यालय, नांदेड येथे केले होते. प्रशासकीय कारणास्तव या दिनांकामध्ये बदल करण्यात आलेला आहे.

कागदपत्रे पडताळणी व शारीरीक क्षमता चाचणीसाठी अर्ज क्रमांकानुसार उमेदवारांना पोलीस मुख्यालय येथे बोलाविण्याचे सुधारित वेळापत्रकाबाबत सविस्तर माहिती https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1php या संकेतस्थळावर देण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक डॉ. के.ए.धरण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविली आहे.

# प्रकृती अस्वस्थतेमुळे खा. वसंतराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रम रद्द

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**

मतदारसंघातील कार्यक्रम, विविध भेटीगाठी या सततच्या धावपळीमुळे नांदेड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार वसंतराव चव्हाण ह्यांना व्हायरल इन्फेक्शन झाल्यामुळे त्यांची प्रकृती अस्वस्थ आहे. दरम्यान नांदेड येथून पुढील उपचारासाठी हैदराबाद येथे जात असल्याने खा. वसंतराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रम रद्द करण्यात येत असल्याची माहिती चव्हाण कुटुंबीय, नायगाव तालुका काँग्रेस तसेच नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.



नांदेड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खा. वसंतराव चव्हाण हे सतत कार्यमग्न असल्याने यादरम्यान त्यांना व्हायरल इन्फेक्शन झाल्यामुळे त्यांची प्रकृती ठिक नसल्याने पुढील उपचारासाठी ते हैदराबाद येथे जात आहेत. दरम्यान त्यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ऑगस्ट रोजी नायगाव येथे आयोजित करण्यात आलेला महाकीर्तन सोहळा व महाप्रसादाच्या कार्यक्रमसह अभिष्टचिंतन सोहळा रद्द करण्यात आला आहे.

# नायगाव तहसीलसमोर गरजवंत शेतकऱ्यांसाठी बेमुदत उपोषणाचा लढा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,१३ ऑगस्ट -**

गरजवंत शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत उपोषणकर्ते ,देवोदास पीराजी वडजे,काशिबा आमनाजी वाकरडे रा. टेंभुर्णी यांनी स्वांतत्र्य दिनाच्या तोंडावर तहसील कार्यालय नायगाव समोर बेमुदत उपोषण चालू केले आहे .

राज्यामध्ये शेतकऱ्यांची आर्थिक, सामाजिक अवस्था बिकट झालेली आहे. निसर्गाचा कोप, प्रशासनाची आरेरावी व वेळकाढूपणा राजकीय नेत्यांनी जाणूनबुजून शेतकऱ्यांना आर्थिक भिकारीपणा आणण्याचे व त्यांना त्यांचा मानसिक छळ करून दयनीय आवस्था केली आहे. आपल्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या जास्तित जास्त वाढत आहेत. पिक कर्जासाठी बँका जवळ येवू देत नाहीत. अश्या



दुहेरी आडचणीत शेतकरी असताना राजकीय मंडळी विधान सभेचे आराखडे रंगविण्यात व्यस्त आहेत.असा आरोप उपोषण कर्त्यानी केला आहे.

उपोषण कर्त्यांनी खालील मागण्या केल्या आहेत .तीन लाख रुपयापर्यंतचे सरसकट कर्ज माफ करण्यात यावे, (सिबील ची अट रद्द करण्यात यावी), शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चावर आधारीत शेतीमालास हमीभावचा कायदा करण्यात यावा, शेतकऱ्यांच्या माल विनाअट खरेदी करावा. यात दलाल हटाव, किसान बचाव कट्टी काटा, माती माउश्चर व बट्टा या अटी रद्द करण्यात याव्यात.अशा मागण्या केल्या आहेत. या उपोषणस्थळी माधवराव चिंतले, चंद्रकांत पवार,डोईवाड उपस्थित होते.

# पशुधन पंधरवडा अंतर्गत पाळज येथे पशुरोग निदान शिबिर



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१३ ऑगस्ट -**

पशुधन पंधरवाडा अंतर्गत पाळज येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भूपेंद्र बोधनकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १२ ऑगस्ट रोजी पशुरोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले.

नांदेड जिल्ह्यातील पशुधनाच्या उत्पादक क्षमतेचा पुरेपूर वापर करून पशुपालनापासून मिळणाऱ्या उत्पादनाद्वारे राष्ट्रीय सकल उत्पादनात भर टाकण्याच्या उद्देशाने पशुपालकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी नांदेड जिल्ह्यात १ ते १५ ऑगस्टदरम्यान पशुसंवर्धन पंधरवडाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने भोकर तालुक्यातील पाळज येथे दि.१२ ऑगस्ट रोजी पशुरोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. विजय चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील जाधव, डॉ. सुरेश पाईकराव, सरपंच सुभाष चटलावार यांची उपस्थिती होती. या शिबिरात वंध्यत्व निवारण, गर्भ तपासणी, शेळ्या- मेंढ्यांचे जंत निर्मूलन, लहान - मोठ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या तसेच पशूंचे लसीकरण करण्यात आले. या शिबिराचा परिसरातील शेतकरी, पशु पालकांनी लाभ घेतला. शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. गणेश कल्याणकर, डॉ. लक्ष्मण पुजरवाड, डॉ. लक्ष्मण सनकाडे, पशुधन पर्यवेक्षक सुमेध बनसोडे, प्रणिता कांबळे, संजय धनवे, विष्णू पांचाळ, सुरेश आरकलवाड आदींनी परिश्रम घेतले.

# लाडकी बहीण येजनेत किनवट- माहूर तालुक्यातील ५४ हजार महिला पात्र

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,१३ ऑगस्ट -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी किनवट मतदारसंघ क्षेत्रनिहाय समितीच्या बैठकीत शासनाच्या पोर्टलवर १२ ऑगस्ट २०२४ रोजीपर्यंत सादर झालेल्या किनवट माहूर तालुक्यातील ५४ हजार ५९० पात्र अर्जाना अंतिम मान्यता दिल्याची माहिती समितीचे अध्यक्ष आ भीमराव केराम यांनी दिली आहे.रक्षाबंधनदिनी पात्र लाभार्थ्यांना दोन हप्त्याचे ३ हजार रु थेटलाभ हस्तान्तरद्वारे प्राप्त होणार असल्याने लाडक्या बहिनीच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे.

राज्यातील शिंदे व फडणवीस सरकारने महिलांच्या सबलीकरणासाठी राज्यात मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण ही महत्वकांक्षी योजना सुरू केली असून या योजनेला किनवट माहूर सारख्या ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आ. भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभाक्षेत्र समितीची बैठक नुकतीच संपन्न झाली असून या बैठकीत १२ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवर किनवट तालुक्यातून ३८ हजार ५७३ तर माहूर तालुक्यातून १७३४३ असे एकूण ५५ हजार ९१६ अर्ज सादर झाले आहेत. दाखल अर्जाची छाननी केल्यानंतर किनवट तालुक्यातील ३७ हजार ६५८ तर माहूर तालुक्यातील १६ हजार ९०५ असे एकूण ५४ हजार ५६३ पात्र अर्जाचा समितीने स्वीकार केले असून ते जिल्हाधिकारी नांदेड यांच्या डॅशबोर्डवर पाठविण्यात आले आहेत.दोन्ही तालुक्यातील एकूण ११२२ अर्जात त्रुटी असल्यामुळे ते तात्पुरत्या स्वरूपात अस्वीकार करण्यात आले असून संबंधित लाभार्थ्यांच्या आयडीवर त्रुटीपूर्ततेसाठी पाठविण्यात आली आहेत. शासन



निर्णयानुसार अपात्रतेच्या कारणाची खात्री करूनच ५९ अर्ज कायमस्वरूपी अस्वीकार केले असून ५४ हजार ५९० पात्र अर्जाना समितीने अंतिम मान्यता दिली आहे.या बैठकीस तहसीलदार शारदा चोंडेकर, माहूरचे तहसीलदार किशोर यादव, किनवटचे गटविकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव, माहूरचे गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, बालविकास प्रकल्प अधिकारी अस्विनी ठकरोड, अशासकीय सदस्य करपुडे पाटील, सुदर्शन नाईक, दत्ता आडे, आ केराम यांचे जनसंपर्क अधिकारी संतोष मरस्कोल्हे, विस्तार अधिकारी श्री वाघमारे हे उपस्थित होते.